सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, २६ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३३२ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## २८ फेब्रुवारीला अवकाशातही भरणार सप्तग्रहांचा कुंभमेळा!



प्रयागराज : महाकुंभमेळ्याची सांगता झाल्यानंतर तिसऱ्याच दिवशी अवकाशातही सप्तग्रहांचा कुंभमेळा भरणार आहे. आगामी २८ फेब्रुवारी रोजी सूर्य मालिकेतील बुध, शुक्र, मंगळ, गुरू, शनि, युरेनस, नेप्च्यून हे सात ग्रह एकाच सरळ रेषेत येणार असून सप्तग्रहांचा हा अद्भुत कुंभमेळा भारतातून याच दिवशी रात्री अनुभवायला मिळेल.

सूर्यमालेतील या ग्रहांचे संचलन जानेवारीतच सुरू झाले आहे. त्यात केवळ शुक्र सहभागी झाला नव्हता. तो २८ तारखेला इतर ग्रहांच्या रेषेमध्ये येणार आहे. नेमके याचक्षणी सूर्याला ग्रहण लागल्यासारखी स्थिती निर्माण होणार आहे. सूर्यदेखील योगायोगाने या सर्व ग्रहांच्या रेषेत आलेला दिसेल.

प्रयाग महाकुंभमेळ्याचे अखेरचे शाहीस्नान झाल्यानंतर अवकाशात अवतरणारी ही पर्वणी ज्यांना अनुभवायची असेल त्यांना युरेनस आणि नेप्च्यून यांना पाहण्यासाठी दुर्बिणीचा आधार घ्यावा लागेल. इतर ग्रह मात्र उघड्या डोळ्यांनी दिसतील. अध्यात्माचा अभ्यास असणाऱ्या काहींच्या मते ही खगोलीय स्थिती आध्यात्मिक ऊर्जा निर्माण करणारी असेल. विशेषतः गुरू ग्रहाकडून निर्माण होणारी स्पंदने पवित्र स्नान करणाऱ्या भाविकांना जाणवतील. त्यामुळे तीर्थराज प्रयागचा महाकुंभमेळा संपलेला असूनही या सप्तग्रहांच्या मिलनसोहळ्याच्या मुहूर्तावरही त्रिवेणी संगमावर होणारा स्नान सोहळा इतर दिवसांपेक्षा वेगळा असेल. विशेष म्हणजे येत्या ऑगस्ट महिन्याच्या मध्यातही सहा ग्रह असेच सकाळच्या वेळी एका रेषेत दिसणार आहेत. त्यावेळेची स्थिती आणि २८ फेब्रुवारीला दिसणारे खगोलीय दृश्य हौशी आणि व्यावसायिक खगोल अभ्यासकांना अत्यंत दुर्मीळ अशी संधी उपलब्ध करून देणारी असेल.

## दिल्ली विधानसभेत गदारोळ, आतिशीसह १२ आमदार निलंबित



नवी दिल्ली : दिल्लीच्या विरोधी पक्ष नेत्या आतिशी यांच्यासह आम आदमी पक्षाच्या (आप) १२ आमदारांना विधानसभेच्या अधिवेशनातून दिवसभरासाठी निलंबित करण्यात आले आहे. आज मांडल्या जाणाऱ्या नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (कॅग) च्या अहवालावर झालेल्या गोंधळानंतर ही कारवाई करण्यात आली.

दिल्ली विधानसभेत लेफ्टनंट गव्हर्नर व्ही. के. सक्सेना यांच्या अभिभाषणादरम्यान आम आदमी पक्षाच्या आमदारांनी गदारोळ घातला. भाषण सुरू होताच आम आदमी पक्षाच्या आमदारांनी मुख्यमंत्री आणि मंत्र्यांच्या कार्यालयातून भीमराव आंबेडकरांचा फोटो हटवल्याचा निषेध करण्यास सुरुवात केली. यावर विधानसभा अध्यक्षांनी आम आदमी पक्षाच्या सर्व आमदारांना दिवसभरासाठी निलंबित केले.

दिल्ली विधानसभेतून निलंबित करण्यात आलेल्या विरोधी पक्षनेत्या आतिशीसह आपच्या आमदारांनी विधानसभेच्या आवारात निदर्शने केली. निलंबनाच्या् कारवाईवर बोलताना आतिशी म्हणाल्या की, भाजपने मुख्यमंत्री कार्यालय, कॅबिनेट मंत्र्यांच्या कार्यालयात डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकरांचे चित्र बदलून पंतप्रधान मोदींचे चित्र लावले आहे. आंबेडकरांचे चित्र त्या जागी लावले जात नाही तोपर्यंत आम्ही त्याचा निषेध करत राहू असे आतिशी यांनी सांगितले.

## शिख विरोधी दंगल : काँग्रेस नेते सज्जन कुमारांना जन्मठेप

नवी दिल्ली, २५ फेब्रुवारी : इंदिरा गांधींच्या हत्येनंतर १९८४ मध्ये उसळलेल्या शिख विरोधी दंगलीच्या एका प्रकरणात काँग्रेस नेते सज्जन कुमार यांना दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने आज, मंगळवारी जन्मठेपेची शिक्ष सुनावली आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने यापूर्वी सज्जन कुमार यांना आणखी एका प्रकरणात जन्मठेप ठोठावली असून सध्या ते तिहार कारागृहात शिक्षा भोगत आहेत.

दिल्लीत उसळलेल्या शिख विरोधी दंगलीदरम्यान सरस्वती विहार परिसरात जमावाने पिता-पुत्राची हत्या केली होती. या प्रकरणी न्यायालयाने सज्जन कुमार यांना १२ फेब्रुवारी रोजी दोषी ठरवले होते. दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टाने आज, मंगळवारी २५ फेब्रुवारी रोजी त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. देशाच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी शीख अंगरक्षकांनी हत्या केली होती. त्यानंतर दिल्लीत उसळलेल्या दंगलीत १ नोव्हेंबर १९८४ रोजी सरस्वती विहार परिसरात जमावाने केलेल्या हल्ल्यात सरदार जसवंत सिंग आणि सरदार तरुण दीप सिंग या पिता-पुत्राची हत्या करण्यात आली होती. यावेळी जमावाला भडकविल्याचा सज्जन कुमार यांच्यावर आरोप होता. सज्जन कुमारच्या चिथावणीनंतर जमावाने वडील आणि मुलाला त्यांच्या घरात जिवंत जाळल्याचा आरोप आहे. जमावाने घराची तोडफोड, लूटमार करून आग लावली होती. तसेच घरातील इतर लोकांनाही मारहाण करून जखमी केले होते. सध्या सज्जन कुमार दिल्ली कॅन्टमध्ये झालेल्या दुसऱ्या शीखविरोधी दंगल प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. सज्जन कुमारला आज तिहार तुरुंगातून न्यायालयात हजर करण्यात आले होते.

## महापालिका निवडणुका पुन्हा लांबणीवर! आता ४ मार्चला सुनावणी



नवी दिल्ली : महापालिका निवडणुकीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर आता ४ मार्च रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे राज्यातील महापालिकेच्या रखडलेल्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे इच्छुकांचा हिरमोड झाला आहे.


महापालिका निवडणुका रखडल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवडसह तब्बल २३ महापालिकांवर प्रशासकीय राजवट आहे. प्रभाग रचना, लोकसंख्येत १० टक्के वाढ धरून निश्चित केलेली सदस्य संख्या आणि ओबीसी आरक्षण यावरून तब्बल ५७ वेगवेगळ्या याचिका सुप्रीम कोर्टात दाखल आहेत.

त्यावर एकत्रित सुनावणी २२ जानेवारी रोजी होणार होती. मात्र, बुधवारी होणाऱ्या सुनावण्यांच्या यादीत या याचिकांचा समावेश नव्हता. त्यानंतर २८ जानेवारी रोजी सुनावणी झाली नाही. पुढील सुनावणी २५ फेब्रुवारी म्हणजे आज होती. पण आजही सुनावणी झाली नाही. त्यामुळे या याचिकेवर आता ४ मार्च रोजी सुनावणी होणार आहे.

## उद्धव-राज एकत्र आले तरी युतीला धोका नाही; आठवलेंचा टोला

सोलापूर, २५ फेब्रुवारी : महाराष्ट्राच्या राजकारणात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे कधीही एकत्र येणार नाहीत. दोघे एकत्र आले तरी महायुतीला फटका बसणार नाही. कारण दोघांचेही राजकारण संपलेले आहे, अशी टीका केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली. राज्यमंत्री आठवले हे सोमवारी सोलापूर दौऱ्यावर होते. शासकीय विश्रामगृहात त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते बोलत होते. यावेळी आरपीआयचे प्रदेश अध्यक्ष राजा सरवदे, के. डी कांबळे, सुशील सरवदे आदी उपस्थित होते. आठवले म्हणाले, येत्या जिल्हा परिषद, मनपा निवडणुकांमध्ये आरपीआयला जागा द्यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. एक एमएलसी तसेच एका मंत्रिपदाची मागणी त्यांच्याकडे केली होती. कार्यकर्त्यांसाठी ही मागणी केली होती. आता महामंडळावर माझे कार्यकर्ते दिसतील.

## बोगस पीएचडी धारकांचे धाबे दणाणले! पदव्यांची होणार तपासणी




मुंबई : राजस्थान येथील जगदीशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठातून (जेजेटीयू) पीएच.डी. मिळविणाऱ्यांची तपासणी केली जाणार आहे. त्याअनुषंगाने केंद्रीय अनुदान आयोगाचे सचिव मनीष जोशी यांनी १२ फेब्रुवारी २०२५ रोजी एका पत्राद्वारे देशभरातील विद्यापीठांच्या कुलगुरूंना अशा बोगस पीएच.डी. तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे बोगस पीएच.डी पदवीधारक किती महाशय आहेत, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

विद्यापीठांच्या प्रत्येक कृतीवर यूजीसीचे नियंत्रण असते. तथापि, राजस्थान येथील जगदीशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठाने बोगस पीएच.डी. पदवी दिल्याचे दिसून आले. त्यामुळे यूजीसीच्या स्थायी समितीने जेजेटीयूद्वारे सादर केलेली माहिती, डेटा विश्लेषण, तपासणी आणि मूल्यांकनानुसार पीएच.डी.च्या तरतुदीचे पालन झाले नाही, असा ठपका ठेवला आहे.

पी.एच. डी. च्या पुरस्कारासाठीचे नियम आणि शैक्षणिक मापदंडाला छेद दिला. तसेच यूजीसी पीएच.डी.च्या तरतुदींचे पालन करण्यात जेजेटीयू का अपयशी ठरले? हे स्पष्ट करण्याची संधी देण्यात आली होती. तथापि, जेजेटीयूने फारसा प्रतिसाद दिला नाही, असे यूजीसीने पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे यूजीसीच्या स्थायी समितीने या बोगस पीएच. डी. प्रकरणी कठोर पावले उचलली आहेत.

## प्रसिद्ध अभिनेता संतोष नलावडे यांचं अपघाती निधन



नांदेड , २५ फेब्रुवारी : लोकप्रिय टीव्ही अभिनेते संतोष नलावडे यांचं निधन झालं आहे. 'लाखात एक आमचा दादा' आणि 'अप्पी आमची कलेक्टर'यांसारख्या अनेक प्रसिद्ध मालिकांमधून घराघरात पोहोचलेले अभिनेते संतोष नलावडे यांनी जगाचा निरोप घेतल्याने, त्यांच्या चाहत्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संतोष नलावडे यांचा मृत्यू अपघातात झाला. महसूल क्रीडा स्पर्धेसाठी संतोष नलावडे नांदेडला गेले होते. परंतु, नांदेडमध्ये असतानाच त्यांचा अपघात झाला. या अपघातात ते गंभीर जखमी झाले, आणि त्यांना तातडीने उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी शर्तीचे प्रयत्न केले, परंतु दुर्दैवाने काल (२४ फेब्रुवारी ) उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.त्यांच्या निधनाची बातमी समजताच,त्यांचे पार्थिव वाढे गावी आणण्यात आले, जिथे शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## बोलेरोच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

### बनोटी-पाचोरा रस्त्यावरील घटना;-सोयगाव तालुक्यातील घटना

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२५ फेब्रुवारी



रस्त्यावर उभ्या असलेल्या तरुणाला बोलेरो गाडीने दिलेल्या जोरदार धडकेत तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना बनोटी पाचोरा रस्त्यावरील निंभोरा (ता.सोयगांव) गावाजवळ सोमवारी (दि.२४) घडली

अशोक पिरा म्हात्रे (वय.४३) रा.निभोंरा (ता.सोयगांव) असे मृत तरुणाचे नाव आहे.

अशोक म्हात्रे आणि मावस भाऊ निंभोराहुन बनोटी कडे दुचाकीने (एम.एच.१९ डि.वाय.३७०४) घरगुती कामाकरीता जात असतांना निंभोरा गावाच्य पुढे सरस्वती भुवन हायस्कूल जवळ काही आठवण आल्याने रस्त्याच्या कडेला थांबला होता तेवढ्यात हातातील मोबाईल रस्त्यावर पडला, मोबाईल उचलन्याकरीता खाली वाकला असता बनोटी कडुन पाचोराकडे जात असलेल्या भरधाव जाणार्या बोलेरो गाडी क्रमांक (एम.एच.१९ डि.एफ.१३७७ )दिलेल्या जोरदार धडकेत अशोकच्या डोक्याला जबर मार बसला आणि जमिनीवर कोसळला मावसभाऊ आणि ग्रामस्थ जमा होऊन बनोटी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता आरोग्य अधिकारी डॉ.रब्बानी शेख हिने तपासणी करून मृत घोषित केले.तर बनोटी दुरक्षेत्रात दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस उपनिरीक्षक रज्जाक शेख,राजेंद्र बर्डे,श्रीकांत तळेगावकर, राजु बरडे,संदिप सुसर आदिंनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करून पुढील तपास करीत आहेत.

निभोरा येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर दुपारी एक वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले असून त्याचा पश्चात पत्नी,दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे.

## मंत्रालयाच्या सुरक्षा जाळीवर उडी घेत तरुणाचं आंदोलन

मुंबई, २५ फेब्रुवारी : मंत्रालयातल्या सुरक्षा जाळीवर एका तरुणाने उडी मारुन आंदोलन केलेल्याची घटना आज, मंगळवारी घडली. आंदोलकाने सुरक्षा जाळीवर उडी मारल्यानंतर पोलिसांनीही सुरक्षा जाळीवर उड्या मारत त्याला ताब्यात घेतले. साधारण अर्धा तास सुरु असलेल्या या प्रकारामुळे मंत्रालयात आलेल्या अभ्यागतांनी एकच गर्दी केली होती. सुदैवानं मंत्रालयात लावण्यात आलेल्या सुरक्षा जाळीत हा तरुण अडकल्याने मोठा अनर्थ टळला. यासंदर्भातील माहितीनुसार आंदोलक तरुण महसूल खात्यासंदर्भात तक्रारीच्या निवारणासाठी मंत्रालयात आला होता. परंतु, त्याचे काम होत नसल्यामुळे संदर तरुण पुरता वैतागला होता.

## बारामती, बीडला प्रत्येकी ५६४ कोटी अन्...

### फडणवीस सरकारचे ७ महत्त्वाचे निर्णय

मुंबई : राज्य मंत्रिमंडळाची आज मंत्रालयामध्ये बैठक पार पडली. या बैठकीमध्ये सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सचिवालयाने या निर्णयांची माहिती जारी केली आहे. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांमध्ये दोन नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालयांना मंजुरी देण्याबरोबरच एका बँकेसंदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क कक्षाने मंगळवारी दिनांत २५ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या बैठकीमधील निर्णयांचा संक्षिप्त आढावा घेणारी सात निर्णयांची यादी जारी केली आहे. यामध्ये वित्त विभागाने सार्वजनिक उपक्रम, महामंडळांना ठाणे जनता सहकारी बँकेत खाती उघडण्यास परवानगी देण्याच्या महत्त्वाच्या निर्णयाचाही समावेश आहे. याशिवाय पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावांसाठी मोठी आर्थिक मदत देण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला आहे.

**मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीमध्ये कोणते निर्णय झाले हे संक्षिप्त स्वरुपात पाहूयात...**

१) पौड, ता. मुळशी, जिल्हा पुणे येथे लिंक कोर्टऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाची स्थापना करण्यास मान्यता. (विधी व न्याय विभाग)

२) ठाणे जनता सहकारी बँकेत सार्वजनिक उपक्रम, महामंडळे यांना खाते उघडण्यासाठी परवानगी (वित्त विभाग)

३) १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय; अशा ३३२ गावठाणासाठी ५९९.७५ कोटी रुपये मंजूर (मदत व पुनर्वसन विभाग)

४) महाराष्ट्र राज्य आधारसामग्री (डेटा) धोरणास मान्यता; राज्य डेटा प्राधिकरण स्थापन करणार. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती. (नियोजन विभाग)

५) बारामती जिल्हा पुणे येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपये मंजूर (कृषि व पदुम विभाग)

६) परळी, जिल्हा बीड येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपये मंजूर (कृषि व पदुम विभाग)

७) महाराष्ट्र महामार्ग अधिनियम कलम १८(३) १९५५ मध्ये सुधारणा, तसेच महाराष्ट्र महामार्ग अध्यादेश २०२५ ला मान्यता (सार्वजनिक बांधकाम विभाग)

## 'गोयल ग्रामीण विकास संस्थे'सह पी. आर. श्रीजेश यांना जनकल्याण समितीचा 'श्रीगुरुजी पुरस्कार'



पुणे, २५ फेब्रुवारी : राजस्थानमधील 'गोयल ग्रामीण विकास संस्थान' आणि भारतीय हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक पी. आर. श्रीजेश यांना यंदाचा 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती'तर्फे प्रतिवर्षी हा पुरस्कार प्रदान केला जातो. पुण्यात शनिवारी, १ मार्च रोजी होणार्या कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर उपाख्य श्रीगुरुजी यांच्या जयंतीदिनानिमित्त हा पुरस्कार दिला जातो. या राष्ट्रीय पुरस्काराचे यंदा ३० वे वर्ष आहे. 'जनकल्याण समिती'चे अध्यक्ष डॉ. अजित मराठे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत या पुरस्कारांची घोषणा केली. संस्थेचे कार्यवाह प्रमोद गोर्हे यावेळी उपस्थित होते. पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असे आहे. या पुरस्कारासाठी यंदा कृषी आणि क्रीडा ही क्षेत्र निश्चित करण्यात आली होती, असे डॉ. मराठे यांनी सांगितले.

संकेश्वर पीठाचे श्री स्वामी शंकराचार्य या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. संघाचे सहसरकार्यवाह डॉ. कृष्णगोपालजी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आहेत. पुरस्कार प्रदान समारंभ शनिवार, १ मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे होईल.

राजस्थानातील कोटा येथील 'गोयल ग्रामीण विकास संस्थान'ने गो-आधारित जैविक कृषी विकासासाठी भरीव कार्य केले असून स्वदेशी बीज बँकेचा संस्थेचा प्रयोग शेती क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे. प्राचीन आणि पारंपरिक कृषी पद्धतीचे संशोधनही या संस्थेतर्फे करण्यात आले आहे. देशातील पहिले सेंद्रिय शेती संशोधन केंद्र या संस्थेने सुरू केले आहे. शेतीच्या क्षेत्रातील अनेक यशस्वी प्रयोग ही संस्था सातत्याने करत आहे.

भारतीय हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक पी. आर. श्रीजेश यांनी स्वकर्तृत्त्वाने क्रीडा क्षेत्रावर त्यांची मोहोर उमटवली असून भारतीय हॉकी संघाचे कप्तान म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सन २०१७ मध्ये ते पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झाले, तसेच यंदा त्यांच्या कामगिरीचा गौरव पद्मभूषण पुरस्काराने करण्यात आला आहे. सन २०२० आणि सन २०२४ च्या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये भारताला पदक मिळवून देण्यात त्यांनी गोलरक्षक म्हणून केलेली कामगिरी मोलाची ठरली. अर्जुन पुरस्कार, मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारानेही ते सन्मानित आहेत.

'गोयल ग्रामीण विकास संस्थान' आणि पी. आर. श्रीजेश यांचे त्यांच्या क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय असून त्यांच्या या कार्याचा सन्मान 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान करून केला जाईल. पुणेकर नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून त्यांच्या कार्याला प्रोत्साहित करावे, असे आवाहन 'जनकल्याण समिती'तर्फे करण्यात आले आहे.

'जनकल्याण समिती'ची सेवाकार्ये

'जनकल्याण समिती'तर्फे महाराष्ट्रात आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण, पूर्वांचल विकास, दिव्यांग कल्याण या पाच प्रमुख क्षेत्रात तेरा मोठे प्रकल्प चालवले जात आहेत. त्यात प्रामुख्याने रुग्णालय, तीन रक्तकेंद्र, पूर्वांचल वसतिगृह, पुण्यातील सेवा भवन, दिव्यांगांसाठी विविध प्रकल्प या सेवाकार्यांचा समावेश आहे.

## सावधान ! कन्नड नगरपालिकेची थकबाकी न दिल्यास होऊ शकते जप्ती

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२५ फेब्रुवारी :- कन्नड नगरपालिका सतर्क झाली असुन थकीत व मालमत्ता कर न भरणा करणाऱ्या नागरिकांच्या विरोधात कडक पावले उचलण्याच्या तयारीत आहे



दि.२४ रोजी काढलेल्या प्रसिद्धीपत्रक काढले आहे शहरात मोठ्या प्रमाणात स्वच्छता, पाणीपुरवठा यासारखे गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत तरी आपण सर्वांनी आपल्याकडे असलेला थकीत व चालू वर्षाचा मालमत्ता कर तात्काळ भरावा अन्यथा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अन्वये मालमत्ता जप्तीसाठी वॉरंट बजावून कर रकमे इतके घरातील वस्तू जप्त करून लिलाव काढून कर भरणा करून घेतला जाईल.

गाळे सील करण्यात येतील, थकबाकीदारचे नळ कनेक्शन खंडित करण्यात येईल, व्यावसायिक/व्यापारी यांची दुकाने सिल केली जातील, थकबाकीदारांची नावे वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील, थकबाकीदारांच्या नावाचे यादी चौका-चौकात बोर्डवर लावण्यात येईल, थकीत मालमत्ता धारकांच्या घरासमोर,दुकानासमोर ढोल, ताशे, हलगी वाजवून कराची वसुली करण्यात येईल,तसेच ना हरकत दाखला, झोन दाखला, घराचा उतारा व कोणतीही सुविधा सन २०२४-२५ अखेर कर भरणा केल्याशिवाय मिळणार नाही.असे आवाहन प्रसिद्धी पत्रका द्वारे करण्यात आली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### परभणी शहर संघर्ष समितीव्दारे अनोखे आंदोलन- पालकमंत्री यांना निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडविण्याच्या मागणीसाठी 'नो रोड नो टॅक्स' असा फलक लावलेले बुलडोझर घेऊन सोमवारी (दि.२४) जिल्हा कचेरीसमोर शहर संघर्ष समितीच्या वतीने अनोखे लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

समितीचे अध्यक्ष विशाल बुधवंत, आजमत खान, सुनील देशमुख यांच्यासह इतर पदाधिकारी यावेळी उपस्थित . आंदोलनानंतर जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. त्याद्वारे, परभणी शहरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नागरी सुविधा देण्या बाबतच्या समस्याचे निराकारण तात्काळ करण्यात यावे. शहरातील रस्ते दुरुस्त करावे, तुंबलेल्या नाल्या स्वच्छ कराव्यात, रस्ते व नाल्यावरील अतिक्रमण तात्काळ काढून टाकावे, महापालिकेने जादाचे व सक्तीचे लावलेले कर कमी करावे, न्यायालयीन आदेशानुसार धर्मदाय नोंदणीकृत शैक्षणिक संस्थांना (ट्रस्ट) यांना करापासून पूर्णपणे मुक्त करण्यात आले आहे, तरीसुद्धा मनपाच्या वतीने भरणा न केल्यास जप्तीची नोटीस देत आहेत, ते बेकायदेशीर . अशा धर्मदाय संस्थांच्या घरपट्टी, नळपट्टी व इतर रक्कम रकान्यात 'करमाफी' असे लिहावे, आदी मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात असून शहरात सध्या धुळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, असे निवेदनात म्हटले.

### शुक्रवारी एक दिवसीय आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** सिरसाळा येथील श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवार २८ फेब्रुवारी रोजी वसमत रस्त्यावरील हॉटेल रामायना येथे इंग्रजी, ग्रंथालयशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन, सैनिकशास्त्र, शारीरिकशिक्षण या विषया अंतर्गत एक दिवसीय आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले .

या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या अध्यक्षस्थानी सोनपेठ येथील सामेश्वर शिक्षण प्रसार मंडळाचे संस्थाध्यक्ष व्यंकटराव कदम, प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव योगेश कदम, प्रमुख मार्गदर्शक म्हणून एस.एन.डी.टी महिला महाविद्यालय मुंबईचे प्रोफेसर डॉ. पांडुरंग बरकाळे यांच्यासह बीजभाषक प्राचार्य प्रोफेसर डॉ. मिलिंद पंडित, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना महाविद्यालययाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. के. के. पाटील, समन्वयक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष डॉ विक्रम धन्वे, तसेच या अंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेत संशोधन मार्गदर्शक म्हणुन प्रमुख उपस्थितीत सैनिकशास्त्र विषयासाठी संशोधन मार्गदर्शक म्हणुन प्रोफेसर डॉ. विजय जाधव (माजी प्राचार्य, आ. डि. वाडीले कला महाविद्यालय, थाळनेर, जि. धुळे, प्रोफेसर डॉ. देवेंद्र विसपुते विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विषयासाठी प्रोफेसर, डॉ. कल्पेश पारकर, क्रिस्त युनिव्हर्सिटी, लवासा, पुणे, प्रोफेसर डॉ. सुरज कारंडे, क्रिस्त युनिव्हर्सिटी, लवासा, पुणे, प्रोफेसर डॉ. शामसुंदर वाघमारे शारदा महाविद्यालय, परभणी, क्रीडा व शारीरिक शिक्षण विषयासाठी प्रोफेसर.ऐ. के. उप्पल अध्यक्ष, शारीरिक शिक्षण फौंडेशन इंडिया, दिल्ली, प्रोफेर डॉ. प. चेन्नप्पा रेड्डी संचालक, एस. के. युनिव्हर्सिटी, हैद्राबाद, प्रोफेसर डॉ. शत्रून्जय . कोते, एम.एस.एम. शारीरिक शिक्षण महाविद्यालय छ. संभाजीनगर, प्रोफ सर. डॉ. शिंकूकुमार सिंग संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड, इंग्रजी विषयासाठी प्रोफेसर. डॉ. सत्यवान हणेगुवे, उप्रचार्य देवगिरी महाविद्यालय, छ. संभाजीनगर, डॉ. विष्णू डब्लू. ट उपप्राचार्य, देवगिरी महाविद्यालय, छ. संभाजीनगर, डॉ. अजय मॅटहेव जॉन, लवासा विदयापीठ, पुणे, प्रोफेसर डॉ. रोहिदास नितोंडे, उपप्राचार्य श्री. शिवाजी कॉलेज, परभणी, ग्रंथालय आणि माहिती शास्त्र विषयासाठी संशोधन मार्गदर्शक म्हणुन प्रोफेसर डॉ. रामदास टेकाळे, शिवाजी कॉलेज, परभणी, प्रोफेसर डॉ. गोवर्धन आवटे, विवेकानंद महाविद्यालय, छ. संभाजीनगर हे उपस्थित राहणार आहेत.

### विद्यार्थ्यांनी कीड व रोग व्यवस्थापनावर संशोधन करावे- कुलगूरु डॉ.इंद्र मणि

**परभणी,/प्रतिनिधी :** पीजी व पीएचडी विद्यार्थ्यांनी कीड व रोग व्यवस्थापन तसेच अचूक शेतीतील खत व्यवस्थापनावर संशोधन करावे, असे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. इन्द्र मणि यांनी केले.

कुलगुरु इंद्र मणि आणि संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी शनिवारी (दि.२२) विद्यापीठाच्या मध्यवर्ती प्रक्षेत्राच्या नवीन विकसित होणाऱ्या क्षेत्राला भेट दिली. त्यानंतर सेंद्रिय शेती संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन टोमॅटो व कांदा संशोधन प्रयोग, हरभऱ्यावर योगिक प्रयोग, गांडूळ खत निर्मिती यांसारख्या विविध उपक्रमांची पाहणी केली. त्यांनी उच्च दर्जाचे गांडूळ खत उत्पादनावर भर द्यावा तसेच विद्यापीठांतर्गत उच्च तंत्रज्ञान आंबा व विदेशी फळ संशोधन केंद्राद्वारे मध्यवर्ती प्रक्षेत्रातील १०० हेक्टर पडीक जमिनीवर फळबाग लागवडीसाठी सुरू करण्यात आलेली . या प्रक्षेत्रास सिंचनासाठी नवीन दोन बोरवेलचे उद्घाटन करून फळबाग लागवडीच्या कार्याची प्रगती पहिली.

### पोलिस ठाण्याच्या आवारात वृक्षारोपण

**सेलू,/प्रतिनिधी:** निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज . या सामाजिक जाणिवेतून शहरात नव्याने बांधकाम सुरू असलेल्या पोलिस ठाण्यासमोरील आवारात पोलिस निरीक्षक दीपक बोरसे यांच्या हस्ते रविवारी (ता. २३) वृक्षारोपण करण्यात आले. संपूर्ण तालुक्याच्या कायदा सुव्यवस्थेचे नियंत्रण करणाऱ्या, जनतेच्या सुरक्षेचा भार असणाऱ्या पोलिस ठाण्याच्या परिसर सुरवातीला स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर या भागात विविध वृक्षांची रोपटी लावण्यात आली. यावेळी सहायक पोलिस निरीक्षक संजय चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक गणेश पवार, पोलिस हवालदार शिवदास सूर्यवंशी, सुरेश पुलाते, ज्ञानेश्वर जानगर, के. आर. मुलगीर, मारोती जाधव, के. एस. तेलगे, पोलिस नायक अजय रासकटला, अमोल वाडेकर, पोलिस कर्मचारी आणि गृहरक्षक दलाच्या जवांनानी वृक्षारोपण केले.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३२४६६६५, ९८४६६४४३०, ९८४६९५५८३




# कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी "अधिकाऱ्यांना एक गाव दत्तक" मोहिम राबविण्यात येणार- पालकमंत्री बोर्डीकर

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी:-** केंद्र व राज्य शासनाच्या कल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याकरीता पालकमंत्री टास्क फोर्सच्या माध्यमातून प्रत्येक अधिकाऱ्यांना ''एक गाव दत्तक'' हा उपक्रम जिल्ह|यात राबविण्यात येणार . या उपक्रमाच्या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांनी गावात योजनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होते का, याचा आढावा प्रत्यक्ष गावाला नियमितपणे भेट देऊन घ्यावा, अशी सूचना राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

पालकमंत्री टास्क फोर्सच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. बैठकीस जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर आदींसह सर्व विभागप्रमुख उपस्थित . प्रारंभी परभणी जिल्हा सुशासन निर्देशांकामध्ये पहिल्या क्रमांकावर येण्यासाठी जिल्ह्यात विविध उपक्रम प्रभावीपणे कशा पध्दतीने राबविण्यात येतील, याबाबत पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी बैठकीत सविस्तर आढावा घेतला. तर विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात कोणकोणते उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. याची यावेळी थोडक्यात माहिती दिली.

केंद्र व राज्य शासनाच्या कल्याणकारीयोजनातळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याकरीता पालकमंत्री टास्क फोर्सच्या माध्यमातून प्रत्येक अधिकाऱ्यांना ''एक गाव दत्तक'' हा उपक्रम जिल्ह|यात राबविण्यात येणार . या उपक्रमाच्या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांनी गावात योजनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होते का, याचा आढावा प्रत्यक्ष गावाला नियमितपणे भेट देऊन घ्यावा, अशी सूचना राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली. पालकमंत्री टास्क फोर्सच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. बैठकीस जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर आदींसह सर्व विभागप्रमुख उपस्थित . प्रारंभी परभणी जिल्हा सुशासन निर्देशांकामध्ये पहिल्या क्रमांकावर येण्यासाठी जिल्ह्यात विविध उपक्रम प्रभावीपणे कशा पध्दतीने राबविण्यात येतील, याबाबत पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी बैठकीत सविस्तर आढावा घेतला. तर विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात कोणकोणते उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. याची यावेळी थोडक्यात माहिती दिली.

पालकमंत्री म्हणाल्या की, शिक्षण, शेती, आरोग्य ही महत्त्वाची क्षेत्र आहेत, या क्षेत्रात आपला जिल्हा अग्रक्रमांकावर राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. शासनाच्या अनेक चांगल्या योजना आहेत, या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळण्यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याला पालकमंत्री टास्क फोर्स या उपक्रमाच्या माध्यमातून एक गाव दत्तक दिले जाणार . यासोबतच शाळाही दत्तक दिली जाणार . त्या अधिकाऱ्यांनी महिन्यातून दोन वेळा गावाला भेट देऊन कामाची पाहणी करावी. हे काम अतिशय उत्स्फूर्त आणि दक्षतेने प्रत्येक अधिकाऱ्यांनी करुन आपल्या जिल्ह्याचा नावलौकीक वाढवावा. जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी परभणी जिल्ह्यात ''अधिकाऱ्यांना एक गाव दत्तक'' ही मोहिम अतिशय यशस्वीपणे राबविली जाईल, अशी ग्वाही दिली

पालकमंत्री म्हणाल्या की, शिक्षण, शेती, आरोग्य ही महत्त्वाची क्षेत्र आहेत, या क्षेत्रात आपला जिल्हा अग्रक्रमांकावर राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. शासनाच्या अनेक चांगल्या योजना आहेत, या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळण्यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याला पालकमंत्री टास्क फोर्स या उपक्रमाच्या माध्यमातून एक गाव दत्तक दिले जाणार . यासोबतच शाळाही दत्तक दिली जाणार . त्या अधिकाऱ्यांनी महिन्यातून दोन वेळा गावाला भेट देऊन कामाची पाहणी करावी. हे काम अतिशय उत्स्फूर्त आणि दक्षतेने प्रत्येक अधिकाऱ्यांनी करुन आपल्या जिल्ह्याचा नावलौकीक वाढवावा. जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी परभणी जिल्ह्यात ''अधिकाऱ्यांना एक गाव दत्तक'' ही मोहिम अतिशय यशस्वीपणे राबविली जाईल, अशी ग्वाही दिली.

### श्रीसमर्थ वेद विद्यालयाच्या अध्यक्षपदी जयप्रकाशजी बिहाणी उपाध्यक्षपदी सीतारामजी मंत्री, संजय लड्ढा सचिव

**सेलू,/प्रतिनिधी:** महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान, आळंदी (पुणे) संचालित ढालेगाव (ता.पाथरी जि.परभणी) येथील श्री समर्थ वेद विद्यालयाच्या अध्यक्षपदी सेलू येथील प्रसिद्ध उद्योजक जयप्रकाश बिहाणी, उपाध्यक्षपदी सीताराम मंत्री, सचिवपदी संजय लड्ढा (मानवत), कोषाध्यक्षपदी सुरेंद्र तोष्णीवाल, तर सहसचिवपदी मनोज मंत्री यांची सर्वानुमते निवड करण्यात आली .

कार्यकारी मंडळाची विशेष सर्वसाधारण सभा रविवारी, २३ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडली. या सभेत आगामी पाच वर्षासाठी नूतन कार्यकारी मंडळ आणि पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया पूर्ण झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांनी काम बघितले. जेष्ठ सदस्य ॲड. अशोक सोनी यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यकारी मंडळातील अन्य सदस्यांत विष्णूकुमार चिचानी. ॲड.अशोक सोनी, गोविंद अजमेरा, नंदकिशोर कालानी, राजेन्द्र मणियार, बजरंगजी गिल्डा, संगीता तिवारी, प्रा.अशोकजी चिंदूरवार, कल्पना भुतडा, डॉ.राधेश्यामजी सिखवाल यांचा समावेश .

#### वेद शिक्षणाचे निरंतर कार्य...

राष्ट्रसंत स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनात ढालेगाव येथील श्रीसमर्थ वेद विद्यालय हे मागील ३१ वर्षापासून वेद शिक्षणाचे कार्य निरंतर करीत . चारही वेदांच्या सहा शाखांचे शिक्षण विद्यालयात दिले जाते. सध्या एकूण ८५ विद्यार्थी वेद शिक्षण घेत . त्यांना सात वेदशास्त्रींचे मार्गदर्शन मिळत . विद्यालयाला राष्ट्रीय स्तरावरील भारतआत्मा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . महर्षी सांदीपनी राष्ट्रीय वेद विद्या प्रतिष्ठान उज्जैन शिक्षा मंत्रालय भारत सरकारशी वेदविद्यालय संलग्न . वेद शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांवर भर दिला .






### जनतेच्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करावे- पालकमंत्री साकोरे

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात ''जनता दरबार'' पार पडला.

आपल्या समस्यांचे निराकरण व्हावे यासाठी, जिल्हयातून मोठ्या प्रमाणात नागरिक आले . तक्रारदारांची समस्या स्वत: पालकमंत्री यांनी जाणून घेत जागेवरच संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून तक्रारींचे तातडीने निरसन करण्याची सूचना त्यांनी यावेळी दिली. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर यांच्यासह सर्व विभागप्रमुख यावेळी उपस्थित . एकूण ६५१ अर्जदारांनी आपल्या तक्रारी सादर केल्या. तक्रारदारांना कुठलीही अडचण भासू नये म्हणून जिल्हा प्रशासनाने अतिशय काटेकोरपणे नियोजन केले .

# समर्पणभाव, त्याग, कर्तृत्व आणि दातृत्वाची जाण ठेवून काम करणाऱ्या व्यक्ती निश्चीत कौतुकास पात्र- सदगुरु काशिनाथ महाराज पाथ्रीकर

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** जगद्गुरु जगत्तज्योती महात्मा बसवेश्वर यांनीच आपल्या आचरणातून शिकवणं दिली आहे.आपण त्या आचरणाने पथक्रमण करणं म्हणजे आपले जीवन सार्थकी लागलं . आपण समाजात वावरताना आपले संस्कार, आचार विचार फार महत्त्वाचे असतात. समाजातील घटकांना गृहीत धरून कामं करण्यासाठी धडपड आणि पराकाष्ठा करावी लागते.कोणतेही काम सहजासहजी करणं शक्य नसून ते सर्वांगांनी परिपूर्ण असलं कि समाज मान्यता मिळते. कठीण प्रसंगातून जाताना बौद्धिक क्षमतेची कसोटी लागते ती क्षमता ज्यांच्या ठायी असते तेच काम पुर्णत्वास जातं .गणपत आप्पांनी जे जे काम समाज उपयोगी



केलं त्याचं कामाचं फलित म्हणजे हा आजचा सन्मान होय.

त्यासाठी झिजावं लागतं त्याग , समर्पण भाव, दातृत्वाची जाणं ठेवून काम करणाऱ्या व्यक्तीची नोंद समाज घेत असतो. असं प्रतिपादन दिनांक २३ फेब्रुवारी रविवार रोजी शिवनाम सांगता सप्ताहात समाज भूषण गौरव पुरस्कार वितरण प्रसंगी ष.ब्र. १०८ सद्गुरू काशिनाथ महाराज पाथ्रीकर हे बोलत . अध्यक्षीय समारोप करताना अशोक वाडकर म्हणाले कि समाजाच्या हिताकरीता खूप खूप कामं करता येतात.वीरशैव समाजातील व्यक्तींनी मतभिन्नता विसरून चांगल्या कामासाठी एकत्रित आलं पाहिजे. दुरदृष्टी, समाजहित, मंदिर उत्पन्नाच स्त्रोत वाढीसाठी पुढे आले तर निश्चितच स्पृहणीय . आपण आज आहोत उद्या कोणीही असणार आहे परंतु चांगले काम करत राहिल्यास समाजातील व्यक्तींनी सहकार्याची भूमिका निभावली जावी अशी अपेक्षा व्यक्त करतो. या संपूर्ण सप्ताहात आध्यात्मिक संस्कारक्षम कार्यक्रमाचं पौरिहित्य मंदिर देवस्थानचे पुजारी कैलास स्वामी थळपती व कैलास स्वामी मिटकर यांनी केले.सप्ताहात विविध धार्मिक आध्यात्मिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले होते.रुद्र अभिषेक, प्रासादिक किर्तन, शिवलिला अमृत पारायण, सायंकाळी संगीत शिवकथा वेदमूर्ती विरभद्र स्वामी पिंपळगावकर त्यांना साथसंगत लिंबराज पाटील, योगेश स्वामी यांनी दिली. यावेळी सप्ताहात अन्नदान आणि अन्य कामांसाठी योगदान देणाऱ्या सद् भक्तांचा संस्थानाचे अध्यक्ष यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचं प्रास्ताविक पवन मिटकरी, सूत्रसंचालन संस्थानाचे सचिव प्रा.मिलिंद झमकडे, आभार ॲड शाम राऊत यांनी मानले. तर गौरव प्रमाणपत्राचं वाचन पवन स्वामी कामटे यांनी केलं. कार्यक्रमं यशस्वी करण्यासाठी श्री.शंकरलिंग मंदिर देवस्थानचे सदस्य बालासाहेब सरकाळे,विश्वनाथ हुगे,शुभंम सोळंके,शुभंम महाजन, गणेशआप्पा केशरखाणे प्रकाश साखरे ,शुभंम नवघरे, किरण भगत, बाळासाहेब वीर, महेश शेटे, सागर महाजन, संजय झमकडे, राजेंद्रआप्पा नावाडे , दत्तात्रय मिटकर, अशोकआप्पा मसुरे, सुनील नवघरे , महेश,मिटकर, सचिन चौरे , दत्तात्र उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# कारवाईचे अर्धशतकही पुर्ण न करत पोलिस 'बाद' तर रेती माफियांची पून्हा तुफान 'फटकेबाजी'





**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २५ फेब्रुवारी**

चॅम्पीयन्स ट्रॉफी सुरू असल्यामुळे सर्वत्र क्रिकेट सामन्यांमध्ये जोरदार फटकेबाजी होत असताना आता रेती माफियांची देखील रेती उपसा, वाहतुक करण्याची तुफान फटकेबाजी सुरू केली आहे. तर दुसरीकडे कारवायांचे अर्धशतकही पुर्ण न करत पोलिस 'बाद' झाले असल्याचे दिसून येत आहे.

फेब्रुवारी महिन्याच्या सुरवातीसच जिल्हा पोलीस प्रशासनाने रेती माफियांवर जोरदार कारवाई सत्र सुरू केले. या कारवाई सत्रात जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी पुढाकार घेतल्याने शहर, परिसरासह जिल्हाभरात पोलीसांनी दमदार कारवाया करत कोट्यावधींचे साहित्य जप्त केले तर अनेकांवर गुन्हे दाखल केले. कारवाईच्या धास्तीने रेती माफियांनी रेती उपसा वाहतुक जवळपास बंदच केली होती. रेती उपसासाठी आलेल्या बिहारी टोळ्या परतीच्या मार्गावर होत्या परंतू मागील दोन ते तीन दिवसापासून अवैध रेती उपसा, वाहतुक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. केवळ रात्रीच्या वेळेसच नव्हे तर शहर, परिसरातील हस्सापुर, असर्जन आदी ठिकाणाहुन सकाळी ९ वाजेपर्यंत रेती वाहतुक सर्रासपणे सुरू असल्याचे दिसून येत आहे. पोलीसांनी अवैध रेती वाहतुकी विरोधात कडक भुमिका घेतल्याने रेती उपसा, वाहतुक बंद होईल अशी अपेक्षा नांदेडकर व्यक्त करत होते. परंतू अवघ्या १५ दिवसानंतर पुन्हा अवैध रेती उपसा, वाहतुकीने जम बसविण्याची तयारी सुरू केली आहे. एकीकडे क्रिकेट चॅम्पीयन ट्रॉफीमध्ये फटकेबाजी सुरू असताना त्याच पध्दतीने रेती माफियांनी रेती उपसा, वाहतुक केली असुन या फटकेबाजीला रोखण्यात पोलीस कशी गोलंदाजी करतील याकडे नांदेड वासीयांचे लक्ष लागले आहे.

**पंधरा दिवसातच पुन्हा अवैध रेती उपसा सुरू**

जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी दुचाकीवर नदी पात्रापर्यंतचा प्रवास करत अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर कारवाई केली. या कारवाईमुळे जिल्हा पोलीस दलावर समाज माध्यम, प्रसिध्दी माध्यमातून मोठ्या प्रमाणात अभिनंदनाचा वर्षाव झाला. जिल्हा पोलीस दल या कारवाईत सात्यता ठेवेल अशी अपेक्षा असतानाच केवळ १५ दिवसानंतर पुन्हा अवैध रेती उपसा, वाहतुक सुरू झाली असल्याने नांदेडकर आश्‍र्चय व्यक्त करत आहेत.

# आ. चिखलीकरांच्या पाठपुराव्यामुळे घरकुलांसाठी दोन लाखांचे अनुदान

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २५ फेब्रुवारी**

ग्रामीण भागातील पंतप्रधान ग्रामीण आवास योजनेत घरकुल बांधणीसाठी लाभार्थ्यांना किमान दोन लाख रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी केली होती.

ग्रामीण आवास योजनेतील राज्यातल्या लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व थेट खात्यात अनुदान वितरण कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्रामीण आवास योजनेत दोन लाख रुपये अनुदान देण्याची घोषणा केली. लोहा तालुक्यातील पंतप्रधान ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांना आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली घरकुल लाभार्थ्यांना मंजूरी पत्र व थेट खात्यात अनुदान सोहळा ऑनलाइन प्रणालीद्वारे तहसील कार्यालय संपन्न झाला.



यावेळी तालुक्यातील ९ हजार २९० घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात थेट डीबीटीमार्फत अनुदान जमा करुन दुसऱ्या टप्प्यातील लाभार्थ्यांना मंजुरी आदेश आ.प्रताप चिखलीकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला गटविकास अधिकारी डि. के. आडेराघो, माजी सभापती आनंदराव पाटील, बाबुराव केंद्रे उमरगेकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, शिवसेना उपजिल्हा प्रमुख बाळासाहेब कऱ्हाळे, माजी सभापती खुशाल पांगरीकर, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, उपनगराध्यक्ष दता वाले, माजी उपसभापती नरेंद्र गायकवाड, मारोतराव पाटील बोरगांवकर, शिवसेना संघटक मिलिंद पवार, भास्कर पाटील, पंचायत समिती कार्यालयीन अधीक्षक प्रियदर्शन वाघमारे, अभियंता सचिन माने, अभियंता मांजरमकर, रमेश वाघमारे, अर्जुन राठोड, मारुती कदम घरकुल विभाग प्रमुख दिनेश तेलंग यांसह सरपंच, उपसरपंच लाभार्थी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## महाशिवरात्रीनिमित्त नगरेश्वर मंदिरातर्फे आज पालखी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २५ फेब्रुवारी**

प्रतिवर्षाप्रमाणेच महाशिवरात्रीनिमित्त श्री नगरेश्वर वैश्य मंदिर, सराफा, नांदेड च्यावतीने बुधवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७-३० वाजता श्री नगरेश्वर महादेव पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ६९ व्या अखंड हरिनाम सप्ताहांतर्गत सायंकाळी ५ ते ७ या वेळेत ह.भ.प. ज्ञानेशभक्त डॉ. महेश महाराज शेवाळकर यांचे हरिकीर्तन होणार आहे. भाविकांनी कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष भागवत गंगमवार, सचिव सुरेश कोडगिरे आणि धार्मिक समतीप्रमुख गणेश गादेवार यांनी केली आहे.



**नांदेड- नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पो.नि. ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने जप्त केलेला देशी-विदेशी दारूचा ३ लाख ४४ हजार ९६५ रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला.**

## अवैध व्यवसायाविरोधात गावकऱ्यांनी दिला उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. २५ फेब्रुवारी**

तालुक्यातील कुंटूर पोलीस ठाणे कोणत्या ना कोणत्या कारणास्तव सतत चर्चेत राहते. गेल्या वर्षामध्ये येथील पोलीस ठाण्यात अनेक सहाय्यक पोलीस निरीक्षक आले परंतु आज पर्यंत कुंटूर ठाण्याच्या हद्दीतील आंतरगाव, कुंटूर फाटा येथे मोठ्या प्रमाणात चालणारे जूगार व अवैध रित्या दारू विक्री व्यवसायाला लगाम घालण्यात त्यांना यश आले नाही. त्यामुळे अशा व्यवसायाच्या विरोधात अनेक गावच्या अनेक वेळा लेखी व तोंडी तक्रारी दिल्या. परंतु ठाणेदारांना मात्र आळा न घालता उलट अतिशय जोमाने चालविण्यासाठी एका प्रकारे पाठबळच दिल्याची शंका अंतरंगावातील गावकऱ्यांच्या मनात निर्माण होत आसल्याने येथील तंटामुक्ती अध्यक्ष माजी सरपंच प्रकाश शिंदे यांनी या विरोधात उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

कुंटूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील यांनी ठाण्याचा पदभार स्वीकारल्या पासून ठाण्याच्या हद्दीत अंतरगाव, कुंटूर फाट्या यासह अनेक भागांमध्ये अवैध व्यवसायाने सध्या तरी डोके वर काढले आहे. विना रॉयल्टी दहा टायरी वाळूचे मोठ मोठे हायवा भरून वाळू वाहतूक होतांना दिसून येत आहे. हा सर्व प्रकार कुंटूर ठाणे प्रमुखांना माहीत असतांनाही कुठली ही कार्यवाही होताना दिसून येत नाही. हे अवैद्य व्यवसाय अनेक वर्षापासून चालत असल्याने यांना अभय कोणाचे आहे ?असा प्रश्न कुंटूर पोलीस ठाण्या अंतर्गत येणाऱ्या गावातील सामान्य जनतेतून उपस्थित केला जात आहे. तर गेल्या काही दिवसांपासून अवैध दारू विक्रीमुळे ठाण्यात अंतर्गत गावातील अनेकांचे संसार उध्वस्त होत आहेतच उलट शाळेतील लहान मूले देखील व्यसनाधीन होत असल्याचे चित्र सध्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. त्याबद्दल यापूर्वी विविध दैनिकातून बातम्या प्रसिद्ध होऊन ही ठाणे प्रमुखांनी कुठलीच कारवाई केलेली दिसून आली नसल्यामुळे अवैध व्यवसायिकांचे मनोबल उंचावले आहे. त्यामुळे असे सर्व अवैध धंदे बंद करण्यासाठी कुंटूर ठाण्यातंर्गत येणाऱ्या गावांपैकी अंतरंगावातील माजी सरपंच तथा तंटामुक्ती अध्यक्ष प्रकाश शिंदे व गांवकऱ्यातुन मागणी केली आहे. तर येणाऱ्या काही दिवसात हे अवैध व्यवसाय बंद नाही केल्यास अंतरगावातील गांवकऱ्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर चालक पोलीसांच्या ताब्यात

**कुंडलवाडी-**मांजरा नदीच्या पात्रातून वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकास कुंडलवाडी पोलीसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून ३ लाख ६ हजारचा मुद्देमाल जप्त केला आहे. दि.२५ फेब्रुवारीच्या पहाटे पोलीसांनी हरनाळी शिवारातील मारोती मंदिरा समोरून कुंडलवाडी कडे येणाऱ्या ट्रॅक्टर क्र. एम. एच. २६, बि.क्यू. ८६१८ ला थांबूवून पाहिले असता ट्रॅक्टर मध्ये वाळू असल्याचे आढळले. सदर ट्रॅक्टर चालकाकडे परवाना नसल्याने ट्रॅक्टर चालक व मालक हणमंत सायबु जलदेकर रा. हरनाळी यास ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला करण्यात आला असुन पुढील तपास पो.हे.कॉ. माधव पाटील करीत आहेत.

### विद्यापीठात नवोदित कवींसाठी कविता लेखन कार्यशाळेचे आयोजन

**नवीन नांदेड-**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ मार्च रोजी विद्यापीठात नवोदित कवींसाठी 'कवितालेखन कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत मान्यवर कवी, अभ्यासक आणि समीक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा नि:शुल्क असून विद्यापीठ आणि विविध महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास शिक्षण घेणारे आणि लेखनाची आवड असणारे विद्यार्थी कार्यशाळेत सहभागी होवू शकतात. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या प्राचार्य अथवा विभाग प्रमुखांच्या शिफारस पत्रासह कार्यशाळा संयोजक तथा मराठी भाषा अधिकारी डॉ. पी. विठ्ठल (९८५०२४१३३२) यांच्याशी संपर्क साधून नावनोंदणी करावी. या कार्यशाळेत ५० विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. ही कार्यशाळा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या सभागृहात होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल, असे संयोजक डॉ. पी. विठ्ठल यांनी कळवले आहे.

### अवैध देशी दारु विक्री करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल

**कुंडलवाडी-**विना परवाना देशी दारू विक्री करणाऱ्या दोघा विरुध्द कुंडलवाडी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. कुंडलवाडी पासून जवळ असलेल्या धर्माबाद तालुक्यातील शेळगाव (थडी) येथे आपल्या किराणा दुकाना समोर देशी दारूची बेकायदेशररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्या प्रकरणी विजय नागनाथ रामपूरे यांच्या विरुध्द कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याच्याकडून देशी दारुच्या ३ हजार ३६० रुपये किंमतीच्या ४८ बाटल्या जप्त केल्या आहेत. तसेच कुंडलवाडी पासुन जवळच असलेल्या बिलोली तालुक्यातील चिरली येथील सुमनबाई भगवान कदम यांच्या विरुध्द देखील गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यांच्याकडून १ हजार ५४० रुपये किमतीच्या २२ बाटल्या जप्त करण्यात आले असून पुढील तपास स. पो. नि. ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मार्गर्शनाखाली सुरू आहे.

### शिल्पाताई लोखंडे यांना जनसंवाद पुरस्कार


**नांदेड-** येथील सामाजिक कार्यकर्त्या शिल्पाताई लोखंडे यांना यावर्षीचा



जनसंवाद पुरस्कार खा. रविंद्र चव्हाण, आ. श्रीजया चव्हाण, डॉ. गजानन देवकर, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक माधवराव मातुळकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरिषभाऊ गोरठेकर, माजी कृषी सभापती बाळासाहेब रावणगांवकर, स्वागताध्यक्ष सतिश पाटील मातुळकर, निमंत्रक बालाजी सूर्यतळे, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती जनसंवाद पुरस्कार निवड समितीच्या वतीने देण्यात आली.

### चैतन्यनगर शिवमंदिरात महाशिवरात्री निमित्त आज सालासर मंडळाची भजन संध्या

**नांदेड-**चैतन्यनगर शिवमंदिर (नांदेड) येथे महाशिवरात्रीचा भव्य उत्सव भव्य स्वरूपात आज साजरा होत असून यानिमित्त विवीध धार्मिक



कार्यक्रमा सोबत भजन गायन आयोजित करण्यात आले आहेत. नांदेड येथील सुप्रसिध्द असलेले सालासर भजनी मंडळ, नंदी महाराज भजनी मंडळ, शिवा शिव भजनी मंडळ, जागृत महिला मंडळ काबरानगर यांचा भजनाचा कार्यक्रम होणार आहे. दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भावीक भक्तांना दिवसभर अखंडपणे साबुदाणा खिचडी चे वाटप सुरू राहणार आहे. भाविकांना शंभूचे सुलभतेने व कमी वेळात दर्शन उपलब्ध व्हावे याकरिता बॅरिकेट लावून पुरुष व महिलांच्या वेग वेगळ्या दर्शन रांगा तयार करण्यात आल्या आहेत. तसेच उन्हापासून भावीकाना त्रास होऊ नये याकरिता मंदीर परिसरात सावलीची व पिण्यासाठी थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. १२ क्विंटल शाबुदाण्याची खिचडी तयार करण्यात येत आहे. तसेच फळांचे वाटप करण्यात येणार आहे. श्री शिव मंदिर संस्थानच्या सभागृहात दिवसभर विविध भजनी मंडळा द्वारे भजनाचा कार्यक्रम राहणार आहे. भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन चैतन्यनगर शिवमंदिर समिती च्या वतीने केले आहे.

# बितनाळ येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना टी-शर्ट वाटप

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २५ फेब्रुवारी**

तालुक्यातील बिसनाळ येथिल शाळेत प्रजासत्ताक दिनाचे औचित्यसाधून आयोजित केलेल्या सप्तरंग कलाविष्कार सांस्कृतिक कार्यक्रमातून प्राप्त झालेल्या निधी मधून इयत्ता पहिली ते सातवी विद्यार्थ्यांना टी-शर्ट वाटप करण्यात आले .

दि. २४ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बितनाळ येथील विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या सप्तरंग कलाविष्कार कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिकांकडून बक्षीस रुपी मिळालेल्या निधीतून इयत्ता पहिली ते सातवी च्या मुला-मुलींना टी-शर्ट वाटप करण्यात आले. मुलींसाठी पोपटी कलर व मुलांसाठी शेंदरी कलरचे टी-शर्ट वाटप करण्यात आले. टी-शर्ट वाटप करताना सरपंच प्रतिनिधी मारोतराव पाटील उमाटे,



उपसरपंच प्रतिनिधी देविदास अक्कमवाड, माजी सरपंच प्रतिनिधी मारोतराव वाघमारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागनाथ घुमलवाड, उपाध्यक्ष बालाजी पाटील सूर्यवंशी, प्रमोद अटपलवाड, किशोर लोखंडे, सुधाकर सूर्यवंशी, शाळेचे मुख्याध्यापक भगवान संपतवार व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

सप्तरंग कलाविष्कार कार्यक्रमाची तयारी शाळेचे मुख्याध्यापक भगवान संपतवार, शेख मौला शिक्षक वडमिले एल. के., घोगरे यु. एस., पेंडलवार एस. पी, कल्याणकर एम. बी., तांबरे आर. जी. , कळसकर के. एन., मोटरवार व्ही. बी., शिवनखेडकर शरदचंद्र यांनी विद्यार्थ्यांकडून करून घेतली. बितनाळ केंद्रप्रमुख संतोष चाटोरीकर यांचे पण कार्यक्रमासाठी अमूल्य असे मार्गदर्शन लाभले. सर्व गावातील नागरिकांनी मुख्याध्यापकांचे व सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## आचारातून विचार पेरणारे राष्ट्रसंत गाडगे बाबा : पेटेकर

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. २५ फेब्रुवारी**



दिवसभर हातात स्वतः झाडू घेऊन गाव स्वच्छ करून रात्री विचारांची पेरणी करून डोके स्वच्छ करणारे आपल्या स्वतःच्या आचारातून विचार पेरणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा होते. असे प्रतिपादन साहित्यिक बालाजी पेटेकर यांनी केले. आदमपूर येथील ग्रामपंचायत कार्यालयातर्फे राष्ट्रसंत गाडगे बाबा महाराजांच्या जयंती निमित्त आयोजीत कार्यक्रमात ते बोलत होते.

बाप हो, पैसे नसेल तर जेवणाचे ताट मोडा, हातावर भाकरी खा, बायकोले लुगडं कमी भावाच घ्या,पण मुलाले शाळेत घातल्याशिवाय राहू नका असे संत गाडगेबाबा म्हणतं. सार्वजनिक स्वच्छता, अज्ञान, अंधश्रद्धा निर्मूलन,शैक्षणिक सुधारणा, जातीभेद,अस्पृश्यता,व्यसनमुक्ती,प्राणीहत्या,अशा अनेक साम जिक विषयांवर कीर्तनाच्या माध्यमातून जन-जागृती करणारे, भुकेल्यांना अन्न, गरीब मुला-मुलींना शिक्षण, बेघरांना घर, रोग्यांना औषध द्या,असे आवाहन करणारे, महाराष्ट्रातील एक महान खरे कृतीयुक्त समाजसुधारक संत गाडगेबाबा असल्याचे बालाजी पेटेकर यांनी सांगितले.

यावेळी चंद्रकांत देवारे (माजी जि.प सदस्य,)मारुती राहीरे (भाजपा जिल्हा सरचिटणीस, नांदेड), कपिल भुसावळे (सरपंच प्रतिनिधी आदमपूर)गजानन शिनगारे(ग्रा.प सदस्य), मारुती दंडे (तलाठी), अनिल कोलमवार, दशरथ सूर्यवंशी, वाघमारे संदीप, सलीम पिंजारी, व गावातील नागरिक उपस्थित होते.

## मुदखेड येथे तिसऱ्या धम्म परिषदेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २५ फेब्रुवारी**

नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीन मुदखेड येथे दि. २ मार्च रोजी अखिल भारतीय भव्य बुद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ९:२० वाजता समता सैनिक दल पथसंचलन तसेच मोफत आरोग्य शिबीर, प्रा नितीश कऱ्हाळे, कवी नितीन चंदनशिवे, मार्शल सुनील सारीपुत्त यांचे व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आव्हान नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट, बोद्ध भूमी प्रशिक्षण केंद्र धम्म परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. या वर्षी बोद्ध भूमी प्रशिक्षण केंद्र महात्मा फुले चौक अशोका नगर मुदखेड दि. २ मार्च रोजी आयोजन केले आहे. अखिल भारतीय बोद्ध महासभा कार्याध्यक्ष भीमराव यशवंतराव आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार



आहे. मोफत सर्व रोगनिदान आयोजित आरोग्य शिबिरात रुग्णांची तपासणी केली जाणार आहे. प्रख्यात व्याख्याते प्रा. नितीश कऱ्हाळे, कवी नितीन चंदनशिवे, मार्शल सुनील सारीपुत्त हे आपल्या खरमरीत शैलीत मार्गदर्शन करणार आहे. बोद्ध धम्म परिषदेत धम्मदेशना भिक्खू डॉ. खेमधाममो महाथेरो, भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो, भिक्खू डॉ. प्रा. एम. सत्यपाल महाथेरो, भिक्खू डॉ. इंदवंश महाथेरो, भिक्खू ज्ञानरक्षित थेरो, भिक्खू पाय्यारत्न थेरो, भिक्खू पाय्यबोधी थेरो, भिक्खू शिलरत्न थेरो, भिक्खू धम्मशील थेरो, भिक्खू पाय्यानंद थेरो, भिक्खू संघपाल थेरो, भिक्खू सुभूती थेरो, भिक्खू अश्वजित थेरो, भिक्खू रेवातबोधी,भिक्खु बोद्धीधम्मा,भिक्खू बुद्धभूषण,भिक्खू पाय्यावर्धन,भिक्खू पाय्यवंश, भिक्खू गगनबोधी, भन्ते पाय्यदीप, भन्ते पाय्यासार करणार आहेत. बोद्ध धम्म परिषदेचा लाभ घ्यावा असे आव्हान डॉ. उपगुप्त महाथेरो पुर्णा,प्रा. डॉ. सत्यपाल महाथेरो, भिक्खू शिलरत्न थेरो, भिक्खू गगनबोधी धम्मदेसना देणार आहेत.

आज समाजामध्ये व्यसनाधीनता वाढत आहे. अकुशल संस्कार दूर सारून कुशल संस्कार मनावर व्हावे बहुजन समाजातील व्यसनाधीनता अज्ञान अंधकार दारिद्रता दूर व्हावी आणि माणूस म्हणून सर्वांना जीवन जगता यावे याकरिता तिसऱ्या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रा. डॉ. एस सत्यापाल महाथेरो मुळावा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# पंधरा दिवसांचे करतात काम अन् महिनाभराचा मिळवतात दाम

## रुई आरोग्य उपकेंद्रातील अधिकारी-कर्मचारी पंधरा दिवसांच्या एकदाच सह्या मारुन राहतात अनुपस्थित

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २५ फेब्रुवारी**

तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र रुई येथे कंत्राटी कामगार आरोग्य सेविका वगळता इतर सर्व अधिकारी व कर्मचारी १५ दिवसांतून फक्त एक दिवस उपकेंद्रात येतात व एकदाच १५ दिवसांच्या सह्या करतात अशी खळबळजनक माहिती सरपंचासह इतर प्रतिष्ठित नागरिकांनी दिल्यावरुन तालुका रुग्ण कल्याण समितीचे सदस्य तथा आमदार भीमराव केराम यांचे प्रतिनिधी अनिल वाघमारे यांनी सरपंच लताबाई गणेश राऊत व इतरांसह रुई प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास सकाळी १०:२२ वाजता भेट दिली असता उपकेंद्राच्या बाहेरील व आतील प्रवेशद्वारावर कुलुप लावलेले निदर्शनास आले व उपकेंद्राचे सर्व अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले याबाबत तालुका आरोग्य अधिकारी माहूर यांना



कळविण्यात आल्यावर तालुका आरोग्य अधिकारी यांच्या सूचनेवरून उपकेंद्राचा पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला असून, अनुपस्थित राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मागील अडीच ते तीन वर्षांपासून जिल्हा परिषद कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद सदस्य हे अध्यक्ष असलेल्या रुग्ण कल्याण समितीची बैठकच झालेली नाही. सध्या या समितीच्या अध्यक्षपदाचा कारभार तालुका आरोग्य अधिकारी हे बघत आहेत.असे असले तरी माहूर तालुका रुग्ण कल्याण समिती मात्र विलक्षण क्टीव्ह मोडवर असून, आज सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:२२ वाजता आरोग्य उपकेंद्रास आ.भीमराव केराम यांचे प्रतिनिधी तथा रुग्ण कल्याण समिती सदस्य अनिल वाघमारे यांनी सरपंच लताबाई गणेश राऊत , पोलिस पाटील परिसरात कामाजी भोयर, ग्रामपंचायत सदस्य संजय बाळकृष्ण चाफेकर, रास्त भाव दुकान चालक नागोराव सुर्वे उपसरपंच चरणसिंग चुंगडे , उत्तमराव सुकळकर व गावातील इतर प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र,रुई येथे भेट दिली असता बाहेरील मुख्य प्रवेशद्वार व आतील प्रवेशद्वार कुलुपबंद अवस्थेत आढळून आले तर उपकेंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत अनुपस्थित निदर्शनास आल्याने तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजेश माचेवार यांच्या सूचनेवरून तालुका आरोग्य सहाय्यक एस.आर.जोगपेटे यांनी पंचासमक्ष पंचनामा करुन तालुका आरोग्य अधिकारी यांना पंचनामा पाठविला आहे.

माहूर तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय अंतर्गत आष्टा,वाई बाजार , सिंदखेड, वानोळा व इवळेश्वर अशी ०५ प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्या अंतर्गत एकूण २७ उपकेंद्र आहेत.यातील इवळेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत सदरील रुई येथील आरोग्य उपकेंद्र येतो.

रुई येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रातील अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत अनुपस्थित राहत असल्या बाबतीत तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित अनुपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असल्याची माहिती माहूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेश माचेवार यांनी तरुण भारतशी बोलताना दिली आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २४ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १० मार्च, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील.

ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी व कल्याण संघटकांचा जिल्हा दौरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -** लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी व कल्याण संघटक ले. कर्नल शरद पांढरे (नि) हे फेब्रुवारी ते मार्च, २०२५ मध्ये जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी दौरे करणार आहेत. या दौऱ्या दरम्यान तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पातळीवर समितीची बैठक घेण्यात येईल. त्यामध्ये आजी, माजी सैनिक, विधवा व त्यांचे अवलंबित प्रशासन संबंधित अडीअडचणी यावर संबंधित विभागाशी सविस्तर चर्चा करण्यात येईल.

रेणापूर तहसील कार्यालय येथे २७ फेब्रुवारी २०२५ रोजी ११ वाजता, उदगीर तहसील कार्यालय येथे २८ फेब्रुवारी २०२५ रोजी ११ वाजता, लातूर तहसील कार्यालय येथे ११ मार्च २०२५ रोजी ११ वाजता, औसा तहसील कार्यालय येथे १८ मार्च २०२५ रोजी ११ वाजता, निलंगा तहसील कार्यालय १८ मार्च २०२५ रोजी १२ वाजता, चाकूर तहसील कार्यालय येथे २१ मार्च २०२५ रोजी ११ वाजता, अहमदपूर तहसील कार्यालय येथे २१ मार्च २०२५ रोजी १२ वाजता, शिरुर अनंतपाळ तहसील कार्यालय येथे २५ मार्च २०२५ रोजी ११ वाजता, देवणी तहसील कार्यालय येथे २५ मार्च २०२५ रोजी १२ वाजता, जळकोट तहसील कार्यालय येथे २८ मार्च २०२५ रोजी ११ वाजता या बैठका होतील. तरी सर्व आजी, माजी सैनिक, विधवा व अवलंबितांनी या दौऱ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नलशरद पांढरे (नि) यांनी केले आहे.

### 'दिशा' प्रतिष्ठानने केली पाच विद्यार्थ्यांना आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा**

आर्थिक परिस्थितीने अडचणीत असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये याच भावनेतून मागील अनेक वर्षांपासून लातूर येथील दिशा प्रतिष्ठानचे कार्य सुरू आहे. होतकरू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश शुल्क भरत असून हा आधार या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी मोलाचा ठरत आहे. सोमवारी पाच विद्यार्थ्यांचे ६० हजार ५०० रुपये प्रवेशशुल्क भरले. संस्थेच्या कार्यालयात विद्यार्थ्यांना धनादेश देण्यात आला.

यावेळी विवेक रेड्डी, चंद्रकांत बिराजदार, जगदीश जाधव, हंसराज जाधव, प्राचार्य निलेश राजमाने व दिशा प्रतिष्ठानचे मार्गदर्शक अभिजित देशमुख यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते. ग्रामीण भागातील केवळ दिशाची ही सामाजिक बांधिलकी दिशादर्शक ठरत असून विद्यार्थ्यांना मोठा आधार देणारी असल्याची भावना मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

प्रास्ताविकात दिशा प्रतिष्ठानचे मार्गदर्शक अभिजीत देशमुख यांनी दिशाच्या सामाजिक बांधीलकीचा आलेख उपस्थितांसमोर ठेवला. सूत्रसंचालन अनिल ढमाले यांनी केले. आभार वैशाली यादव यांनी मानले.

### महात्मा बसवेश्वरच्या विद्यार्थ्यांचे जेईई मेन्स परीक्षेत उज्ज्वल यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -** महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी अभिजीत स्वामी (९७.२०), अभिषेक स्वामी (९४.९५) आणि स्वरांजली नवटाके (९१.३८) यांनी जेईई मेन्स परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले आहे. या गुणवान आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा प्राचार्य कक्षात नुकताच सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्रचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, डॉ. गुणवंत बिराजदार, स्टाफ सेक्रेटरी प्रा. रवींद्र सुरवसे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची आदी उपस्थिती होती.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगते व्यक्त करताना म्हटले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी आम्हाला वेळोवेळी जेईई मेन्स परीक्षा विषयी मार्गदर्शन केले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील यांनी सर्व शुभेच्छापर मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गुणवंत बिरादार यांनी केले, तर आभार प्रा. रवींद्र सुरवसे यांनी मानले.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींचा मोर्चा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -** मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींना मुदतवाढ देण्यात यावी, या मागणीसाठी प्रशिक्षणार्थी सहायक संघटना आक्रमक झाली आहे. राज्य शासनाने प्रशिक्षणार्थींना मुदतवाढ द्यावी, या मागणीसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहायक संघटनेच्यावतीने सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

राज्य सरकारने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेंतर्गत वेगवेगळ्या आस्थापनांमध्ये राज्यातील हजारो बेरोजगार युवक-युवतींच्या हाताला प्रशिक्षणार्थी म्हणून काम मिळाले. मात्र, प्रशिक्षणार्थीचा विहीत कालावधी केवळ सहा महिन्यांचा करण्यात आल्याने अनेकांचा कार्यकाल संपुष्टात येत आहे. शासनाने ही मुदत वाढवावी आणि अशा प्रशिक्षणार्थींना सेवेत कायमस्वरूपी सामावून घ्यावे, विद्यावेतन न देता सेवावेतन द्यावे, शासकीय भरती प्रक्रियेत अशा प्रशिक्षणार्थींना १० टक्के आरक्षण देण्यात यावे, या मागण्यांसाठी सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून बालाजी पाटील चाकूरकर व संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिकेत मादळे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकताच अनेकांनी मनोगत व्यक्त केले.

या मोर्चात संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिकेत मादळे, प्रकाश लंगडे, जिल्हा उपाध्यक्ष शुभम पांचाळ, प्रणव बिराजदार, माया कांबळे, लक्ष्मी मोहिते, सानिया शेख, प्रगती कांबळे, राजश्री पिटले, प्राजक्ता मांदळे, विष्णू क्षीरसागर, विवेक खोत, अश्विनी भोजने यांच्यासह जवळपास अडीच हजार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

# स्वच्छता ताई, सफाई कामगारांना कामावर घ्या

## महापालिका आयुक्ताकडे केली मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -** २०१७ पासून लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत जनाधार सेवाभावी संस्थेमार्फत ऑक्टोबर २०२४ पर्यंत आम्ही कामावर होतो. नवी संस्था आल्यानंतर आमचे काम बंद करण्यात आले आहे. त्यामुळे आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. आम्हाला पूर्ववत कामावर घ्यावे, या प्रमुख मागणीसाठी स्वच्छता ताई व सफाई कामगारांनी सोमवारी आयुक्तांना साकडे घातले.

विधानसभेच्या निवडणुकीनंतर कामावर घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते, परंतु प्रशासनाकडून आश्वासन पाळले नाही. आम्हाला कामावर सेवाभावी संस्था किंवा महानगरपालिका प्रशासनाने घेतले नाही. कोरोना काळात जीवाची पर्वा न करता लातूर शहर महानगरपालिका सांगेल ते काम केले आहे. त्यामुळे महापालिकेला वेगवेगळे पुरस्कार मिळाले आहेत. मात्र, आता आमचे काम बंद केले आहे. आमची उपासमार टाळण्यासाठी कामावर घ्यावे, असे आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले असून, प्रस्तुत मागणीसाठी महानगरपालिकेच्या आंदोलन सुरू केले आहे.

# अचानक ब्रेक लावल्याने एसटी टेम्पोला धडकली; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -** भरधाव वेगातील टेम्पो चालकाने अचानक ब्रेक लावून थांबविल्यामुळे फिर्यादीची बस त्यावर धडकली. यात बसचे २० हजारांचे नुकसान झाले आहे. याबाबत बसचालकाने दिलेल्या तक्रारीवरून टेम्पो चालकाविरुद्ध विवेकानंद चौक पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नांदेड जाणाऱ्या रोडवर अपघात घडला. पोलिसांनी सांगितले फिर्यादी भानुदास कोंडिबा केंद्रे (रा. बोरगाव खु., ता. जळकोट, जि. लातूर) यांच्या बससमोर भरधाव वेगातील एमएच २४ एयु ५०८९ या टेम्पो चालकाने ब्रेक लावून टेम्पो थांबविला. त्यामुळे एसटी टेम्पोवर धडकली. यात वीस हजारांचे नुकसान झाले आहे, असे भानुदास केंद्रे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यानुसार टेम्पो चालकाविरुद्ध विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गन्हा नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हा नोंद असून, पुढील तपास पोहेकॉ. वाघमारे करीत आहेत.

टेम्पो चालकाने निष्काळजीपणे भरधाव वेगात असताना अचानक ब्रेक लावले. त्यामुळे एसटी टेम्पोवर धडकली.

# शाळा सकाळच्या सत्रात सुरु करण्याची सीईओंकडे मागणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -** उन्हाची तीव्रता, पाणी टंचाई व रमजान महिन्याचे उपवास सुरू होत असल्यानिमित्त १ मार्च २०२५ पासून शाळा सकाळच्या सत्रात सुरू कराव्यात, अशी मागणी जिल्हा परिषद शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने लातूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.

शिक्षक संचमान्यतेसह जिल्ह्यांतर्गत बदलीबाबत शिक्षकांची कार्यशाळा घेऊन मार्गदर्शन करावे. बदलीस इच्छुक शिक्षकांना त्यांच्या ऑनलाईन प्रोफाईल अपडेट करणे, विकल्प भरण्यासंदर्भात, केंद्र किंवा तालुक्याच्या ठिकाणी बदली प्रक्रियेबाबत शिक्षकांची कार्यशाळा घेऊन मार्गदर्शन करावे. यंदा उन्हाची तीव्रता अधिक आहे. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासेल. उन्हाच्या झळांमुळे आरोग्याच्या समस्या वाढण्याची शंका आहे. रमजान महिना उपवास, अशा वेगवेगळ्या अडचणी समोर येत आहेत. विद्यार्थी, शिक्षकांचे हित लक्षात घेऊन जिल्ह्यातील शाळा १ मार्चपासून सकाळ सत्रात कराव्यात. निवडश्रेणीचे प्रस्ताव दोन वर्षांपासून धुळखात आहेत. त्यातील ५० टक्के प्रस्ताव जि. प. प्रशासनाने गहाळ केले. प्रस्ताव देण्यासाठी शिक्षकांना जि.प.चे खेटे मारावे लागत आहेत. पात्र शिक्षकांचे सर्व प्रस्ताव मंजूर करून तात्काळ निवडश्रेणी आदेश पारित करावेत.

डिसेंबर २०२३मध्ये जाहीर केलेल्या चटोपाध्याय वरिष्ठ श्रेणीच्या यादीत पात्र शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीपासून वंचित राहावे लागते. त्रुटींची पुर्तता करून तात्काळ पात्र शिक्षकांचे चटोपाध्याय वरिष्ठश्रेणी पुरवणी आदेश पारित करावे. विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, माध्यमिक शिक्षक, पदवीधर पदोन्नती प्रक्रिया राबवून रिक्त पदे भरावेत. नोकरी करत शैक्षणिक अर्हता वाढविलेल्या शिक्षकांना पूर्ण केलेल्या अभ्यासक्रम, पदवीसाठी तत्काळ कार्योत्तर परवानगी द्यावी. वैद्यकीय बिले मंजूर करावीत या सह इतर मागण्याचे निवेदन देण्यात आले आहे.

# माजी विद्यार्थी फाउंडेशन सेवा पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -** रोटरी क्लब ऑफ लातूरच्या वतीने दयानंद विज्ञान माजी विद्यार्थी फाउंडेशनला विशेष सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राजीव गांधी चौकातील रोटरी सभागृहात हा सोहळा मोठ्या उत्साहात झाला.

पुरस्कार वितरण सोहळ्याला मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे, रोटरीचे उपप्रांतपाल हेमंत रामढवे, रोटरीचे अध्यक्ष श्रीमंत कावळे, सचिव जकीखान कायमखानी, रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ लातूरच्या अध्यक्ष डॉ. अर्चना लड्डा, सचिव आनंदा कोचेटा यांची उपस्थिती होती.

यावेळी दयानंद विज्ञान माजी विद्यार्थी फाउंडेशनचे नूतन अध्यक्ष उमाकांत आग्रे, सचिव संजय ढाले तसेच फाउंडेशनचे पदाधिकारी दत्ता पाटे, पी.के. इंगळे, अब्दुल्ला पठाण, विजय किल्लचे, अनंत देशपांडे, परवेज पठाण आदींनी मंचावर येऊन पुरस्कार स्वीकारला. दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन फाउंडेशन स्थापन केले आहे. या फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या दहा-बारा वर्षात अनेक सेवा उपक्रम राबविण्यात आले. त्याची दखल रोटरी क्लबने घेतली असून फाउंडेशनचा विशेष सेवा पुरस्कार देऊन गौरव केला आहे. यावेळी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मशीद रस्त्यावर फळ विक्रीला मुभा

## दिलेल्या जागेतच दुपारी ३ ते रात्री दहा वाजेपर्यंत परवानगी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -** मुस्लिम बांधवांचा पवित्र सण असलेल्या रमजान ईदचे रोजे सुरू होत आहेत. सायंकाळच्या नमाज पठणानंतर मशिदीबाहेर येणाऱ्या मुस्लिम बांधवांना जवळच फळे उपलब्ध व्हावीत, यासाठी गंजगोलाईतील मशीद रस्त्यावर दुपारी तीन ते रात्री दहा या वेळेत केवळ फळ विक्रीसाठी परवानगी देण्यात आली आहे. २५ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत ही परवानगी राहणार आहे. दररोज सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत मात्र फळविक्रेत्यांना फ्रूट मार्केट येथेच व्यवसाय करावा लागणार आहे.

सोमवारी (दि. २४), महापालिका आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लिम समाज बांधवांची महापालिकेत बैठक झाली. यावेळी मुस्लिम समाज बांधवांनी गोलाईतील मशीद रस्त्याच्या कडेला रमजान संपेपर्यंत फळविक्रीला परवानगी देण्याची मागणी केली. रमजानचे रोजे शांततेत पार पडावेत, लातूरची सामाजिक सौहार्द जपणारी परंपरा अबाधित राहावी, यासाठी पालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी समाजबांधवांची बैठक बोलावली होती.



त्यानुसार विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये मुस्लिम समाजबांधवांनी मशीद रस्त्याच्या कडेला फळ विक्रीला परवानगी देण्याची मागणी केली. ती विनंती मान्य करीत आयुक्त मनोहरे यांनी मशीद रस्त्यावर वाहतूक कोंडी होणार नाही, याची दक्षता घेऊन फळ विक्री करणाऱ्या हातगाडी व्यापाऱ्यांना जागा देण्यात येईल. त्याचे उल्लंघन केल्यास हातगाडी जप्त करण्यात येईल, वाहतुकीला अडथळा ठरणार नाहीत, अशा पध्दतीने महापालिकेचा अतिक्रमण विभाग व शहर वाहतूक पोलीस हातगाडीवाल्यांना बसविणार आहेत. दि. २५ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत दुपारी ३ ते रात्री दहा या वेळेतच दिलेल्या जागेत थांबून फळ विक्री करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यापूर्वी सकाळी १० ते दुपारी तीन या वेळेत सर्व फ्रूट विक्रेत्यांना फ्रूट मार्केटमध्ये दिलेल्या जागेतच व्यवसाय करण्याची अट घालण्यात आली आहे. मशीद रस्त्यावर

फळ विक्रेत्यांव्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय करता येणार नाही, भाजीपाला विक्रीलाही बंदी घालण्यात आली आहे. या सर्व अटी मुस्लिम समाजबांधवांनी मान्य असल्याचे सांगितल्यानंतर मंगळवारपासून (दि. २५) दुपारी ३ ते रात्री दहा या वेळेत फळ विक्रीला सुरुवात होणार आहे. ती ३१ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे.

यावेळी झालेल्या बैठकीस महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यासह उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, अतिक्रमण विभाग प्रमुख रवी कांबळे यांच्यासह बागवान संघटनेचे हाजी शब्बीर हाजी सिराजो रहेमान, मुक्तार सत्तारसाब बागवान, जाकीर हुसेन बागवान, पथविक्रेता समितीचे सदस्य गौस गोलंदाज, मुस्लिम क्रांती सेनेचे हमीद पठाण, माजी नगरसेवक आसीफ बागवान यांच्यासह मुस्लिम समाजबांधव, फळ विक्रेते, हातगाडी व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -** महाशिवरात्रीचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने ७२ व्या यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेआहे. हा यात्रा महोत्सव २० दिवस चालणार असून यादरम्यान धार्मिक, आरोग्य, सामाजिक यासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.


महाशिवरात्रीदिनी बुधवारी सकाळी ९.३० वाजता जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर श्रीची महापूजा करण्यात येणार आहे. या विविध उपक्रमांनी भाविकांसह यात्रेकरू व शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन प्रशासक सचिन जांबूतकर यांच्यासह देवस्थानच्या विश्वस्तांनी केले आहे.

महाशिवरात्रीनिमित्त श्री सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने ७२ वा यात्रा महोत्सव दि. २६ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान चालणार आहे. या दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे गवळी समाज बांधवांकडून दुग्धाभिषेक करण्यात येणार आहे. तसेच जिल्हाधिकारी यांच्या हस्ते बुधवार दि. २६ फेब्रुवारी रोजी ध्वजारोहण व श्रीची महापूजा करण्यात येणार आहे. याच दिवशी संत सावता माळी भजनी मंडळ व माळी समाज बांधवांच्या वतीने माळी गल्ली येथून मिरवणूक काढण्यात येणार आहे. विशेष म्हणजे मंगळवारी मध्यरात्री १२ पासूनच देवस्थान व भालचंद्र ब्लड बँक यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याच दिवशी बुधवारी दुपारी १ वाजता गौरीशंकर मंदीर ते सिध्देश्वर मंदीर यादरम्यान पारंपारिक झेंड्यांच्या काठ्याची झेंडा मिरवणूक काढण्यात येणार आहे. तर याच दिवशी रात्री ८ ते ११ यादरम्यान सूरमनी पंडीत बाबूराव बोरगावकर व तालमनी पंडीत डॉ. रामभाऊ बोरगावकर यांचे संगीत भजन व ९ ते ११ यादरम्यान हभप ज्ञानोबा माऊली महाराज आष्टेकर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार दि. २७ फेब्रुवारी रोजी वीरशैव तेली लिंगायत समाज बांधवांच्या वतीने श्रीस गंगेच्या पाण्याचा अभिषेक करण्यात येणार असून याच दिवशी रात्री ९ वाजता हभप जनार्धनदास महाराज वृंदावन यांचे किर्तन होणार आहे.

शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी हभप भागवताचार्य तुकाराम महाराज मुंडे शास्त्री परडी यांचे किर्तन रात्री ९ वाजता होणार असून शनिवार दि. १ मार्च रोजी हभप भागवताचार्य गणेश महाराज वारंगे, बीड यांचे किर्तन रात्री ९ वाजता पार पडणार आहे. रविवार दि. २ मार्च रोजी हभप संजय महाराज खडक उमरगेकर यांचे तर सोमवारी दि. ३ मार्च रोजी हभप समाधान महाराज उमरगेकर,आळंदी यांचे किर्तन रात्री ९ वाजता होणार आहे. मंगळवार दि. ४ मार्च रोजी देवस्थान परिसरात साई फाऊंडेशनच्या वतीने महाआरोग्य शिबिराचे आयोजन



करण्यात आले आहे. याच दिवशी रात्री ९ वाजता हभप गुरुराज महाराज देगलुरकर यांचे किर्तन पार पडणार आहे.

बुधवार दि. ५ मार्च रोजी संगीत भजन होणार असून यामध्ये प्रा. लक्ष्मण श्रीमंगले, प्रा. शिवकुमार उरगुंडे, प्रा. विश्वनाथ स्वामी व तुकाराम आवाड यांचा सहभाग असणार आहे. गुरुवार दि. ६ मार्च रोजी रात्री ८ वाजता कृष्णा हुमनाबादे यांच्यासह दिनेश पोखरकर व सूर्यकांत घोडके यांचे संगीत भजन होणार आहे. शुक्रवार दि. ७ मार्च रोजी पशु प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून याचा उद्घाटन सोहळा सकाळी ११ वाजता पार पडणार आहे. याच दिवशी रात्री संगीत भजन होणार असल्याचे सांगण्यात आले.




सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# निकृष्ट व चुकीचे काम करणाऱ्या गाव फिडर योजनेअंतर्गत इन्फ्राच्या कामा संदर्भात विधिमंडळ अधिवेशनात प्रश्न उपस्थित करणार -आ.लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये अनेक लघु प्रकल्प आहेत त्यापैकी अनेक लघु प्रकल्पांना बळीराजा कृषी संजीवनी योजनेअंतर्गत निधी उपलब्ध झाला असून लिंबे वडगाव पाटोदा साठवण तलावासाठी २६० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याचे काम देखील पूर्ण झाले आहे त्यापैकी लिंबे वडगाव पाटोदा साठवण तलाव यासंदर्भात काही महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा करण्यासाठी आजच्या बैठकीमध्ये हा विषय घेण्यात आला या संदर्भात बोलताना श्री लोणीकर म्हणाले की ही येथील जमिनीचा मावेजा गावाचे पुनर्वसन झाडांचे मूल्यांकन कंदरभरनी करत असताना एकाही लाभार्थ्याचे नुकसान होणार नाही यासाठी प्रशासनाने सतर्क राहणे आवश्यक असून लवकरात लवकर व अधिकाधिक लाभ कसा मिळवून देता येईल यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत. त्याचप्रमाणे कोराडसावंगी येथील कंदर भरणी चेक काम सद्यस्थितीत बंद करण्यात आल्या असून ते सुरळीत सुरू करण्यासंदर्भात सूचना करण्यात आले. यामध्ये ज्या शेतकऱ्यांचे पैसे प्राप्त झालेले आहेत. त्यांना तात्काळ निधी वितरित करण्यात यावा असेही लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच मंठा तालुक्यातील आकणी येथील पुलाचा प्रश्न शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय बनला असून या प्रश्नासंदर्भात आमदार बबनराव लोणीकर यांनी आकणी येथील शेतकऱ्यांनी निवेदन दिले होते त्यानुसार जिल्हाधिकारी महोदयांची भेट घेऊन लघु पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत लवकरात लवकर या ठिकाणी पूल उभारण्यात येईल असे आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले



ऊर्जा विभागाची इन्फ्रामार्फत गाव फिडर योजना ही पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत महत्त्वकांक्षी योजना असून या योजनेअंतर्गत २४ तास वीज उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्नशील आहे परंतु संबंधित कत्राणदार चुकीच्या पद्धतीने पोल ची उभारणी करणे पोल उभारणी करण्यासाठी आवश्यक असणारा अंदाज पत्रकाप्रमाणे खड्डा न खोदणे त्यामध्ये केवळ दगड भरून सिमेंट काँक्रीट अत्यंत अल्प प्रमाणात वापरणे या सर्व बाबींमुळे नैसर्गिक आपत्तीच्या काळात हे पोल उभे राहू शकणार नाहीत परिणामी शासनाचे महत्त्वकांक्षी योजना असताना सुद्धा या योजनेचा फायदा सर्वसामान्य होणार नाही. पूल उभे केले जात असताना सहा फुटापर्यंत खोली घेणे आवश्यक असून त्यामध्ये पूर्ण काँक्रीट करणे अपेक्षित आहे असे असताना केवळ एक फूट किंवा फार झाले तर दीड फुटापर्यंत काँक्रीटकरण करण्याचे करण्यात येत आहे त्यामुळे या योजनेची वरिष्ठांनी चौकशी करून पाहणी करून संबंधित कंत्राटदारवर कठोर कारवाई करावी असा सूचना देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिल्या

भूसंपादन विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत आमदार बबनराव लोणीकर यांनी परतुर विधानसभा मतदारसंघातील गुंठेवारी चा प्रश्न प्रशासनाच्या समोर मांडला भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी भूसंपादन करणे किंवा मोजणी करून देण्यासंदर्भात प्रचंड विलंब करत असून या विलंबामुळे अनेक कामे खुळंबले आहेत नगर विकास विभागाकडे अनेक कामे केवळ मोजणी न केल्यामुळे प्रलंबित असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. शेती संदर्भातील अनेक मोजण्या किंवा गुंठेवारी करण्यासाठी भूमी अभिलेख ची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून संबंधित अधिकारी कुठेही प्रत्यक्ष फिल्डवर काम करताना दिसत नाहीत. ज्या अधिकारी या सर्व कामांमध्ये हल-गर्जीपणा करते त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी त्यांचा अहवाल जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे पाठवावा व त्यांना निलंबित करावे अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी केली. प्लास्टिक मुक्त तालुका अभियान मागील अनेक वर्षापासून सुरू असून या योजना संदर्भात मंठा व परतुर या दोन्ही ठिकाणी गोडाऊन उपलब्ध करून देण्यासंदर्भात सूचना आमदार बबनराव लोणीकर यांनी केली होती त्यानुसार मंठा तालुक्यात गोडाऊन उपलब्ध झाले परंतु परतूर तालुक्यातील गोडाऊन साठी अद्याप पर्यंत जागा मिळालेली नाही या मुद्द्यावरून आमदार बबनराव लोणीकर यांनी स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संबंधित गटविकास अधिकारी यांची कान उघडणे केली व लवकरात लवकर जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात सूचना केली यावेळी बैठकीला जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड परतुर तहसीलदार प्रतिभा गोरे मंठा तहसी-लदार सोनाली जोंधळे गटविकास अधिकारी गगनबोने गटविकास अधिकारी तांगडे लहू पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता श्री शिंगाडे कार्यकारी अभियंता श्री देशमुख सार्वजनिक बांधकाम मंठा उपविभागाचे उप अभियंता निवारे परतुर उपविभागाचे उपअभियंता पाटील यांच्यासह लघु पाटबंधारे विभाग क्रीडा विभाग रस्ते विकास महामंडळ वीज वितरण इनफ्रा, वीज वितरण चे कार्यकारी अभियंता मठपती जिल्हा भूसंपादन अधिकारी यांच्यासह अनेकांची बैठकीला उप-स्थिती होती.

## संक्षिप्त

### तलाठ्यांना खाजगी व्यक्तीला कामावर ठेवणे पडणार महागात

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने तलाठी कार्यालयांमध्ये खाजगी व्यक्तींचा सहभाग आणि कार्यालयांचा वापर याबाबत कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. शासनाने दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना या संदर्भात परिपत्रक जारी केले आहे. तलाठ्यांनी खाजगी व्यक्तींना कामावर ठेवू नये, असे या परिपत्रकात स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. या परिपत्रकाच्या आधारे तलाठी कार्यालयात होणाऱ्या गैरव्यवहारांवर आळा घालण्याची तयारी प्रशासनाने केली आहे.

शासनाच्या या परिपत्रकानुसार, तलाठी कार्यालयांमध्ये खाजगी व्यक्तींना शासकीय कामकाजासाठी नेमणे हे शासनाच्या नियमांचे सरळ उल्लंघन आहे. अशा तलाठी खाजगी प्रकरणांमध्ये म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार कठोर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. तलाठ्यांनी शासनाच्या जागेवरच शासकीय कामकाज करणे आवश्यक आहे, खाजगी जागेतून किंवा खाजगी मदतनीसांच्या सहाय्याने कामकाज करण्यास शासनाने परवानगी दिलेली नाही. विविध जिल्ह्यांमध्ये तलाठी खाजगी व्यक्तींना कामावर ठेवून शासकीय दस्तऐवज त्यांच्याकडून तयार करून घेतात, अशा तक्रारी जनतेकडून सातत्याने येत होत्या. या तक्रारींवर आधारित शासनाने ही कारवाई केली आहे. तलाठी कार्यालयाच्या नियमित कामकाजावर आघात होत असल्यामुळे जनतेची मोठी गैरसोय होत असल्याचेही या तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ यांच्या आधारे तलाठ्यांनी शासकीय कामकाज करणे अपेक्षित आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या तलाठ्यांविरुद्ध शासनाने शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये खाजगी व्यक्तींना कार्यालयात ठेवणे, खाजगी जागेतून शासकीय दस्तऐवज ठेवणे यांसारख्या प्रकरणांवर कठोर कारवाईची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

### प्रधानमंत्री आवास योजनेसाठी नोंदणी करून घ्यावी -उपनगराध्यक्षा छायाताई वाघमारे


**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



प्रधानमंत्री आवास योजनेची ऑनलाईन नोंदणी सुरू करण्यात आली असून नगर पंचायत शहरी भागातील सर्व नागरीकांनी प्रधानमंत्री आवास योजना शहरी भागा करिता २.० बी एल.सी अंतर्गत नवीन घरकुल मंजुरी करीता या वेब पोर्टल (हींींि:ििूळी.ळप झच-धचणड२०२४/झारू उश-षर्रीश्रीं.रीु) वर इच्छुक लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी असे आवाहन मंठा नगर पंचायत च्या उपनगराध्यक्षा सौ छाया अरुण वाघमारे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

ऑनलाइन नोंदणीकरिता घराचे बांधकाम करण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा असावी. कुटुंबाच्या कोणत्याही सदस्याच्या नावाने देशात कोणत्याही भागात पक्के घर नसावे अर्जदाराने पुढील प्रमाणे अर्ज करावे. यात अर्जदाराचे २ आयडी साईझ फोटो, अर्जदार मोबाईल क्रमांक (आधार लिंक असलेला), अर्जदार व कुटूंबातील सर्वांचे आधार कार्ड (आधार क्रमांक, नाव, जन्मतारीख, अर्जदाराचे आधार लिंक असलेले सक्रिय बँक खाते (खाते क्रमांक, बँक नाव, आय एफ सी कोड, अर्जदार कुटूंबाचा उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, जमीन दस्तऐवजी (प्लॉट मालकी ७/१२ उतारा/८ अ किवा सिटी सर्वे उतारा चालू ३ महिन्यातील, खरेदी दस्त (खरेदी दस्त नसेल तर फेरफार, मंठा नगर पंचायत ८ अ उतारा व देणे बाकी नसलेचा दाखला, रेशनकार्ड, प्रतिज्ञापत्र, हमीपत्र, अर्जदार यांचे आई व वडिलांचे कुटुंबातील सर्वच आधारकार्ड (हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्र, पी. एम. स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी. एम. विश्वकर्मा इ. योजनेचा लाभार्थी असल्यास नोंदणी प्रत आवश्य जोडावी व सदरील योजनेचा लाभजास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा असे आव्हान छायाताई वाघमारे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. घर नसावे इतर कोणत्याही शासकीय घरकूल योजनेचा लाभ मागील २० वर्षात घेतलेला नसावा.३) अर्जदार हा आर्थिकदृष्टया मागास घटकातील असावा. (अर्जदार उत्पन्न ३ लाख पर्यंत दाखला आवश्यक आहे.) अर्जदाराचे स्वःच्या नावाने आधार लिंक असलेले बँक खाते असावे. ५) जात प्रमाणपत्र एस सी, एस टी,ओबीसी साठी आवश्यक आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान केले आहे.

### गृहमंत्री साहेब जिल्ह्यातील अवैध धंद्याचा मुख्य आका शोधून कारवाई करा -सुरेश गवळी



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातच नाहीतर जिल्हात सुरू असलेल्या अवैधधंदे, अवैधवाळू वाहतूक,गुटखा माफिया, तांदूळ चोरी राजरोसपणे सुरू आहे,या माफियांची तर आता महसूल प्रशासनावर हल्ले देखील करण्यात मजल वाढली आहे, यांच्या मागील आका कोण?असा प्रश्न आता सर्व सामान्य माणसाला पडू लागला आहे. आम्ही या विरोधात वेळोवेळी आवाज उठवला परंतु जिल्हा प्रशासन असेल तालुका प्रशासन असेल याकडे साफ दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे काही दिवसा-पासून तालुक्यामध्ये नाहक बळी जात आहे.आजच्या घटनेलाही महसूल प्रशासनासह या पुलाचे काम करणारा ठेकेदार रेतीची रॉलटी चुकवण्याच्या नादात नाहक मजुरांचे बळी गेले,या बेजबाबदार ठेकेदार असून या ठेकेदाराविरुद्ध मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी आमची प्रशासनाला मागणी आहे. आणि राज्याच्या गृहमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना विनंती आहे की त्यांनी या जिल्ह्यातील आका चा शोध घेऊन अजून जाणारे नाहक बळी थाबवावेत अशी मागणी आम्ही करत आहेत.

## अमरधान स्मशाभूमीतील संत गाडगेबाबा शांतीवनाचे लोकार्पण संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर, मान्यवरांना पुरस्कार, स्वच्छतादुतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शहरातील नवीन जालना भागातील अमरधाम स्मशानभूमीत (शेरी) श्रमदानाच्या माध्यमातून कायापालट करून तेथे झाडे लावून, भिंतीची रंगरंगोटी करून त्यावर सुंदर सुविचार लिहून तेथे छोटेसे शांतीवन उभारून अंत्यविधीसाठी येणाऱ्यांना बसण्याची चांगली व्यवस्था केलेल्या संत गाडगेबाबा शांतीवनाचे लोकार्पण आज रविवारी (दि.२३) राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंतीचे औचित्य साधून करण्यात आले. डेबुजी परिट समाज जालना आणि गुरू शिष्य परिवाराच्या संयुक्त विद्यमाने छोटेखानी सो-हळा स्मशानभूमीत साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा तसेच स्मशानभूमीत श्रमदान करून स्वच्छता राखणाऱ्या स्वच्छतादुतांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यानिमित्त स्मशानभूमीत रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी ३० दात्यांनी रक्तदान करून मानवतावादी कार्यास हातभार लावला.अमरधाम स्मशानभूमीत करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा परीट समाजाचे माजी जिल्हाध्यक्ष सुभाषराव वाघमारे हे होते तर बदनापूरचे माजी आ. संतोष सांबरे, प्रसिध्द कवयित्री संजिवनी तडेगावकर, प्रसिध्द साहित्यिक प्रा. बसवराज कोरे, पंडीतराव लव्हटे, परीट समाजाचे जिल्हाध्यक्ष किशोर आगळे, लोकमान्य शाळेचे मुख्याध्यापक विजय उबरहंडे, निलेश नन्वरे, श्रीमती करूण हिवाळे, श्रीमती उबरहंडे, डेबुजी समाज आणि गुरू शिष्य परिवारचे संस्थापक किशोर खंडाळे आदींची व्यासपीठावर उप-स्थिती होती.



संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त सकाळच्या सत्रात जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी दोन्ही परिवारातील ३० सदस्यांनी रक्तदान केले. त्यानंतर दुपारच्या सत्रात मुख्य कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांचे श्रीमती मिना इंगळे, श्रीमती लता मेव्हणकर, मिना वाघमारे, किशोर खंडाळे, गणेश इंगळे, रमेश पैठणकर, हर्ष मेव्हणकर, अरूण सुरूसे यांनी स्वागत केले. त्यानंतर अरूण सुरसे, लक्ष्मण उजेड, मच्छिंद्र उजेड, शिवराज उजेड, दिनेश उजेड, योगेश वाघमारे, बळीराम मोरे, चंद्रशेखर ठाकुर, रामेश्वर फड यांचा आदर्श परिवार सदस्य म्हणून तर संत गाडगेबाबा शांतीवनात सुविचार अंकीत करणारे पेंटर तथा गायक शेख जमील यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना प्रसिध्द कवयित्री डॉ. संजिवनी तडेगावकर यांनी खंडाळे गुरूजी यांच्या कार्याचे कौतूक करून स्मशानभूमीतील कार्य निष्काम असल्याचे सांगून सर्वांनी या कार्याला साथ देवून सातत्य टिकवून ठेवावे, असे आवाहन केले. माजी आ. संतोष सांबरे यांनी स्मशानभूमीतील या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे कौतुक करीत आपण आपल्या आयुष्यात पहिल्यांदाच स्मशानभूमीत एखाद्या कार्यक्रमाचे भाषण करीत असल्याचे सांगितले. संत गाडगेबाबांच्या पंचसुत्रीचा सर्वांनी अंगिकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रा. बसवराज कोरे यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याची आठवण करून देत बाबा हे आपल्या आयुष्याची प्रेरणा असून आपल्या जडणघडणीत त्यांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव असल्याचे ते म्हणाले. यावेळी अमरधाम स्मशानभूमीत नियमीत श्रमदान करून परिसर स्वच्छ राखण्यात मोलाची भूमिका बजावत असल्याबद्दल रमेश पैठणकर,रोषण इंगळे, सचिन शिंदे, सचिन शेलार, गणेश मेव्हणकर, नकुल राऊत, विवेक पाटील, रामदास हजारे, गणेश वाघमारे, निलेश नन्नावरे, संतोष रेगुडे यांचाही शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यावेळी प्रास्तविक सुनिल ढाकरके यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गौतम मोरे यांनी केले तर योगेश मोरे यांनी आभार मानले. यावेळी अशोकराव खंडाळे,सुरेशराव वाघमारे, अशोकराव जाधव, अनिल खंडाळे,काशिनाथ मेव्हणकर, संतोष शिंदे, जगतकुमार घुगे,सुभाष घोडके, डिगंबर जाधव, संजय आगळे, बाबासाहेब उजेड,ज्ञानेश्वर निक्कम, सोमेश कोळी, अविनाश कुलकर्णी, प्रदीप देशपांडे, गोपाल शिंदे, जालिंदर लाड, बाबासाहेब ओळेकर, राजेश शेलार,अतुल खंडाळे, कल्पना पेंटेवाड,श्रीमती करुणा हिवाळे यांच्यासह डेबुजी समाज जालना आणि गुरु शिष्य परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उप-स्थित होते.



## नवीन विधिज्ञांना विविध विभागात समाविष्ट करून स्टायपेंड देण्यात यावा-ॲड.धन्नावत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये नवीन विधिज्ञांना संधी उपलब्ध करून देत त्यांना शासकीय स्तरावर स्टायपेंड देण्यात यावा, अशी मागणी ड. महेश धन्नावत यांनी केली आहे.

यासंदर्भात ड. महेश धन्नावत यांनी सोमवार दि. २४ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाचे विविध शंभरपेक्षा जास्त विभाग असून, त्या प्रत्येक विभागात कायदातज्ञांची गरज आहे. त्याचप्रमाणे शासनातर्फे लोक अभिरक्षक विभाग तथा जिल्हा सरकारी अभियोक्ता यांच्या अखत्यारित त्यांच्या हाताखाली नविन विधिज्ञांना कमीत-कमी एक ते दोन वर्ष अनुभव देण्यात यावा आणि स्टायपेंड

बेसेसवर संधी देण्यात यावी. जेणेकरुन नवीन पदवी प्राप्त विधिज्ञांना काम करण्याची संधी मिळेल व अनुभव प्राप्त होईल. कायदेशीर बाबीची पुर्तता होण्यास मदत होऊन न्यायालयीन प्रकरण कमी वेळेत निकाली निघण्यास वाव मिळेल. शिवाय कमी होण्यास मदत होईल. स्टायपेंडमुळे ते त्यांच्या पायावर उभे राहतील. ही बाब विचारात घेता नवोदित विधिज्ञांना न्यायालयीन प्रक्रियेत अनुभव मिळावा आणि त्यांना आर्थिक पाठबळ मिळावे, यासाठी शासकीय न्याय विभाग तसेच जिल्हा सरकारी अभियोक्ता यांच्याकडे सामावून घेऊन मासिक मानधन दिले जावे.नवीन विधिज्ञांना अशा स्वरूपात आर्थिक मदत मिळाल्यास त्यांना न्यायव्यवस्थेतील बारकावे शिकण्याची संधी मिळेल आणि भविष्यात अधिक सक्षम वकील तयार होतील, असे मत धन्नावत यांनी व्यक्त करून, शासनाने या मागणीवर सकारात्मक विचार करून लवकरच निर्णय घ्यावा, अशी विनंती मुख्यमंत्र्यांना या निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी निवेदन देताना त्यांच्यासमवेत विविध वकिलांची उपस्थिती होती.


खरपुडी (जालना) येथे सिडकोचा वादग्रस्त प्रकल्प - शेतकऱ्यांचे नुकसान, आर्थिक हितसंबंध, आणि पारदर्शकतेचा अभाव

## शेतकऱ्यांना योग्य मोबदला न मिळाल्यास प्रकल्प रद्द करण्याची जोरदार मागणी -खा.डॉ.कल्याण काळे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने जालना जिल्ह्यात खरपुडी येथे सिडकोने नवीन प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला असून, या संदर्भात मागील काही वर्षांत विविध प्रशासकीय आणि आर्थिक टप्प्यांवर निर्णय घेतले गेले आहेत. तथापि, या प्रकल्पाच्या व्यवहार्यतेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

सिडकोने जालन्यात प्रकल्प राबविण्यांचा निर्णय घेतल्यानंतर शेतकऱ्यांनी त्याचे स्वागत केले. त्यानुषंगाने भुसंपादनाची कारवाई देखील सुरू केली. परंतु सुरूवातील भूसंपादन करतांना शेतकऱ्यांना दिलेला भाव - मावेजा जमिनीची जी किंमत दिली. तिच रक्कम उर्वरित भुसंपादनाला देण्याची भुमिका शेतकऱ्यांची आहे. ठराविक लोकांना वेगळा भाव दिला जात असुन, उर्वरित शेतकऱ्यांना वेगळा भाव देण्यांत येत आहे, ही बाब अतिशय गंभीर आहे.



शेतकऱ्यांना योग्य भाव न मिळाल्यास शेतकऱ्यांसमवेत आंदोलन उभारण्यांत येईल असे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी स्पष्ट केले.

सदर प्रकल्पाची संकल्पना सन २०१८ मध्ये सिडकोने मांडली होती. त्यानंतर ऐपीीं र्धीपस या आंतरराष्ट्रीय संस्थेची नियुक्ती करून प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यात आला. दिनांक १० जानेवारी २०२० रोजी प्रस्तुत केलेल्या अहवालात सदर प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही, असे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर शासनाने दिनांक ९ जुलै २०२० रोजी हा प्रकल्प निरधिसूचित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, २०२२ आणि २०२३ मध्ये सिडको व शासनाकडून या प्रकल्पाच्या पुनरावलोकनास सुरुवात झाली आणि नवीन घझचत्र्ह अहवालाच्या आधारे २०२४ मध्ये प्रकल्पास अंतिम मान्यता देण्यात आली. पूर्वी अव्यवहार्य ठरलेला प्रकल्प काही वर्षांतच व्यवहार्य कसा काय ठरतो? नवीन आणि जुन्या अहवालांमध्ये काय तफावत आहे? हे शासनाने पारदर्शकपणे स्पष्ट करणे गरजेचे होते, परंतु त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे. तसेच, या प्रकल्पाच्या मंजुरीपूर्वीच काही व्यावसायिकांना संबंधित अधिकाऱ्यांमार्फत गोपनीय माहिती देण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या व्यावसायिकांनी शेतकऱ्यांकडून अत्यल्प दराने जमीन विकत घेऊन त्या जमिनींचे नंतर निवासी क्षेत्रात रूपांतर करण्यात आले. परिणामी, मूळ शेतकरी व भूधारक आर्थिक लाभापासून वंचित राहिले आहेत. याशिवाय, या प्रकल्पाच्या मंजुरी प्रक्रियेत अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या आहेत. आधीच अव्यवहार्य ठरलेल्या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर सरकारी निधी खर्च करणे योग्य नाही. हा निधी इतर पायाभूत सुविधा उभारण्यासाठी वापरणे अधिक हिताचे ठरेल. स्थानिक शेतकऱ्यांनी अगोदरच्या भुसंपादनाला दिलेला भाव मिळाला नाही तर या प्रकल्पास तीव्र विरोध दर्शविला आहे. आमची जमीन डीनोटीफाईड करा असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यामध्ये काही अधिकारी आणि व्यावसायिकांचे आर्थिक हितसंबंध असल्याने हा प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. सदर प्रकल्प-ासाठी २४७ हेक्टर जमीन संपादित करायची असून, त्यामध्ये ५० गटांचा समावेश आहे. आतापर्यंत २० गटांतील ११९ हेक्टर जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण करून दर निश्चित करण्यात आले आहेत. उर्वरित ३० गटांपैकी १६ गटांची मोजणी अंतिम टप्प्यात असून, १४ गटांची मोजणी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. या पार्श्वभूमीवर, सदर प्रकल्पाच्या मंजुरीसंदर्भात घेतलेल्या निर्णयाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यांत यावी. तसेच, शासनाची दिशाभूल करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# महाग निवडणुका लोहशाहीला घातक- जयंत पाटील



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**
दिवसेंदिवस महाग होत चाललेल्या निवडणुका भविष्यात लोकशाहीला घातक आहेत असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी केले.
ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक माणिकराव देशमुख टाकळगव्हाणकर यांच्या जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त व हॉटेल शांतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन व दीप प्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वातंत्र्य सेनानी माणिकराव टाकळगव्हाणकर यांनी आपल्या मुलाखतीमध्ये आम्ही पाहिलेल्या स्वप्नातील भारताचे हे चित्र नाही व त्या काळात शून्य खर्चात निवडणुका लढल्या जात होत्या, असे म्हटल्याने हाच धागा पकडून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील पुढे बोलत होते. निजाम कालीन पोलिसांनी न्यायव्यवस्थेची व स्वातंत्र्योत्तर काळातील आजची परिस्थिती याचीही तुलना करताना आजच्या पोलिसांच्या व न्यायव्यवस्थेच्या भूमिकेवर त्यांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले. स्वातंत्र्य सैनिक माणिकरावजी टाकळगव्हाणकर यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांता पाटील होत्या. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये बोलताना म्हटले की सेवा व सत्कार्याची कास धरली तर शतायुषी होता येते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री गणेशराव दुधगावकर, सुरेशराव वडपुरकर, माधवराव किन्हाळकर, जयप्रकाश दांडेगावकर, आमदार हेमंत पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी खासदार शिवाजीराव माने, माजी आमदार रामप्रसाद कदम बोर्डीकर, भाऊराव पाटील गोरेगावकर, सुरेशराव देशमुख, रामराव वडकुते, मोहनराव हंबर्डे, पंडितराव देशमुख, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती रूपालीताई गोरेगावकर, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, हाउसिंग फायनान्स मुंबईचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सरचिटणीस बसवराज पाटील आदींची उपस्थिती होती. जन्मशताब्दी गौरव समितीचे अध्यक्ष आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी स्वागत पर भाषण केले तर माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. संजय टाकळगव्हाणकर संपादित आजन्म सेनानी या गौरव ग्रंथाचे देखील यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल सोळंके व आभार प्रदर्शन मनोज आखरे यांनी केले. महाराष्ट्र गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नंदकिशोर तोष्णीवाल, खंडेराव सरनाईक, अनिल पतंगे, त्र्यंबकराव लोंढे, मिलिंद उबाळे यांच्यासह गौरव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अमृत संस्थेच्यावतीने खुल्या प्रवर्गातील युवकांना प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**
राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील जाती ज्यांना कोणत्याही शासकीय विभाग, संस्था, महामंडळे यांचेकडून लाभ मिळत नाही त्यांच्या उन्नतीसाठी अमृत संस्था कार्यरत असून सन २०२३ मध्ये अमृतने कौशल्य विकास प्रशिक्षणे, कृषी आधारित उद्योग व्यवसाय स्थापनेसाठी प्रशिक्षणे, केंद्रीय शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षणासाठी अर्थसहाय्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व संघ लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांसाठी प्रोत्साहनपर अर्थसहाय्य अशा योजनांतून अमृतच्या लक्षित गटातील लाभार्थी यांना लाभ पोहोचवला अशी माहीती उपव्यवस्थापक अनिल डोईफोडे यांनी दिली.
या वर्षी अमृतने आणखी अनेक योजना नव्याने सुरू केल्या आहेत. ज्यात किशोर विकासापासून समाजातील विविध स्तरापर्यंत अमृत पोहोचणार आहे. या पूर्वी सुरू असलेल्या शैक्षणिक अर्थसहाय्य, स्पर्धा परीक्षा प्रोत्साहनपर योजना, कौशल्य विकास व कृषी आधारित उद्योग व्यतिरिक्त स्वयं रोजगार व उद्योगाभिमुख कौशल्य विकासासाठी १० वी उत्तीर्ण, आयटीआय ते पदवीधर विद्यार्थांसाठी तांत्रिक कौशल्य विकासासाठी इंडो जर्मन टूल रूम या संस्थेशी अमृतने सामंजस्य करार केला आहे. ज्या कोर्सेसना बाजारात मागणी आहे असे १५ निवासी कोर्स व ३० अनिवासी कोर्स यासाठी निवडले आहे. तेथे इच्छुक लाभार्थीना त्यांच्या शैक्षणिक अर्हता व आवडीनुसार निवासी, अनिवासी प्रशिक्षणे देण्यात येतील. त्यासाठी शैक्षणिक शुल्क व निवास शुल्क अमृत देईल. त्याच धर्तीवर, संगणक क्षेत्रातील मान्यवर संस्था सी-डॅक यांचेकडून त्या क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञान प्रशिक्षणे लाभार्थीना देण्याचे अमृत संस्थेने नियोजित केले आहे. कृषी क्षेत्रात व इतरत्र ड्रोनचा वाढता वापर व त्यासाठी केंद्र व राज्य शासनाची भूमिका विचारात घेता ड्रोन वापराचे प्रशिक्षण राहुरी कृषी विद्यापीठाचे माध्यमातून देण्यात येणार आहे. असे प्रशिक्षित ड्रोन ऑपरेटर यांना केंद्र शासनाचे डीजीसीएचे मान्यताप्राप्त प्रमाणपत्र मिळेल व ते स्वतःचा व्यवसाय किंवा सेवा केंद्र सुरू करू शकतील. तसेच एमसीईडी सोबत सुर्यमित्र, अमृत बेकरी, आयात-निर्यात, आर्थिक साक्षरता त्यासाठी प्रशिक्षण शुल्क व निवास खर्च अमृत करेल. या शिवाय ज्यांचेकडे उद्योग व्यवसायाच्या काही अभिनव कल्पना आहेत त्यांना विकसित करून नवोद्योजक निर्माण व्हावेत यासाठी अमृतने बिझनेस इंक्यूबेशनची योजना आणली आहे. त्यात अशा नवोद्याजकांना तज्ञांचे सर्वांगीण मार्गदर्शन मिळेल. अशा उमेदवारास त्याच्या आकांक्षापूर्तीसाठी पूर्णवेळ प्रयत्नशील राहण्यासाठी अमृत तर्फे एक वर्ष फेलोशिप दिली जाईल. तज्ञांचे मार्गदर्शनासाठी अमृतने शासकीय अभियांत्रिकी, तंत्रज्ञान विद्यापीठ यांचे सोबत सामंजस्य करार केला असून त्यात इतरही संस्थांचा अंतर्भाव केला जाईल.
या प्रशिक्षित कौशल्यधारक लाभार्थ्यांना त्यांचा उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक पाठबळ जरुरीचे असते. त्यासाठी अमृतने वैयक्तिक कर्ज व्याज परतावा ही योजना आणली आहे. यासाठी लाभार्थ्यांना कर्जाची परतफेड नियमितपणे बंधनकारक राहील अशी माहीती जोशी यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुमार भालेराव यांनी केले.
उपस्थितांनी विचारलेल्या सर्व प्रश्न व शंकांचे त्यांनी समाधान केले. उपस्थित सर्वांना त्यांनी अमृतच्या प्रचार व प्रसिध्दीच्या आवाहन केले. अमृतच्या लक्षित गटातील लाभार्थ्यांच्या विकासासाठी हातभार लावण्याची विनंती केली. यावेळी उपव्यवस्थापक उल्हास दिवाळकर, श्रीकांत धोत्रे, अनिल डोईफोडे आदींची उपस्थिती होती.

# नर्सी नामदेव येथे ट्रामा केअर सेंटर उभारण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**
नरसी नामदेव येथील सुप्रसिद्ध संत नामदेव महाराज जन्मस्थळ येथे विरोधी पक्ष नेता जयंत पाटील यांनी भेट दिली यावेळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नामदेव कोरडे यांनी नरसी नामदेव येथे शिर्डी संस्थानच्या धर्तीवर भव्य रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.



नरसी नामदेव येथे राज्यभरातून तसेच राज्याबाहेरील पंजाब प्रांतातून मोठ्या प्रमाणात भक्त भेट देत असतात. भक्तांच्या सेवेसाठी सध्या असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र अपुरे पडत आहे. या ठिकाणी शिर्डी संस्थांच्या धर्तीवर मोफत भव्य रुग्णालय उभारण्याची मागणी यावेळी करण्यात आली. कार्यक्रमास आ. तानाजीराव मुटकुळे, माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर, माजी आमदार रामराव वडकुते, द्वारकादास सारडा, मनोज आखरे, संजयभैय्या देशमुख, माणिकराव लोढे, अशोकराव शिरामे सरपंच असिफ खा पठाण, भिकाजी कीर्तनकार, तालुकाध्यक्ष माधवराव कोरडे, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, संस्थानचे पदाधिकारी, अधिकारी परिसरातील नागरिक भाविक भक्त सेवाधारीमाता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## संक्षिप्त वृत्त

### अंगणवाडी, मदतनीस पदासाठी अर्ज करा

हिंगोली- एकात्मिक बालविकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत बालविकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प हिंगोली या कार्यालयांतर्गत अंगणवाडी मदतनीस पदाच्या रिक्त असलेल्या हिंगोली नगरपालिका क्षेत्रातील २, वसमत नगरपालिका क्षेत्रातील १, औंढा नगर पंचायत क्षेत्रातील २ आणि सेनगाव नगर पंचायत क्षेत्रातील ३ अंगणवाडी मतदनीसांची रिक्त पदे मानधन तत्वावर सरळ नियुक्तीने भरण्यासाठी जाहिरात दिली आहे. यासाठी उद्या दि. २५ फेब्रुवारी ते ११ मार्च, २०२५ या कालावधीमध्ये अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. याबाबतच्या सविस्तर सूचना बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी प्रकल्प) हिंगोली यांचे कार्यालय, श्रीप्रभा, बांगर नगर, हिंगोली-४३१५१३ येथील सूचना फलकावर व संबंधित नगरपालिका, नगर पंचायत येथील सूचना फलकावर लावण्यात आल्या आहेत, अशी माहिती बालविकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प हिंगोली यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

### होमगार्डना कायम सेवेत सामावून घ्या

हिंगोली- राज्यातील होमगार्डना कायम सेवेत सामावून घेण्यात यावे. अनेक वर्षापासून होमगार्ड तुटपूंज्या मानधनावर काम करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाची उपजीवीका चालविणे अवघड झाले आहे अशी मागणी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया मातंग आघाडीच्यावतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### नर्सी नामदेव येथे सेवेकरांचा सत्कार



हिंगोली- मागील अनेक वर्षापासून नर्सी नामदेव येथील श्री संत नामदेव संस्थान येथे सेवा देणाऱ्यांचा सत्कार राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचेहस्ते करण्यात आला. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, माजी आ. रामराव वडकुते, संस्थानचे द्वारकादास सारडा, मनोज आखरे, भिकाली किर्तनकार, भिकुलाल बाहेती, सुभाष हुले, नारायण खेडकर, के के शिंदे, राजासिंह ठाकूर, डॉ नाईक आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मागील अनेक वर्षापासून नर्सी नामदेव येथे विविध प्रकारे दान, अन्नदान तसेच निष्काम सेवा करणारे कांता गुंडेवार, माणिक लोडे, ओमप्रकाश हेडा, भिकाजी कदम, पानबुडे आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी नर्सी नामदेव तीर्थक्षेत्र विकासासाठी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन जयंत पाटील यांनी दिले.

# लाडक्या बहिणींचे अनुदान बंद करणे योग्य नव्हे- जयंत पाटील



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**
शासनाने निकषात न बसणाऱ्या सुमारे ९ लाख लाडक्या बहिणींचे अनुदान बंद केले आहे हे योग्य नसून सरकारने तेव्हाच का निकष लावले नाही, आता निकष लावून अनुदान बंद करणे म्हणजे लाडक्या बहिणींची ही फसवणुक असल्याची प्रतिक्रीया राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली.
येथील नर्सी नामदेव संस्थानला दि २५ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भेट दिली. यावेळी संत नामदेव महाराज समाधी स्थळाचे दर्शन घेतल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी बोलतांना मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासामध्ये पोलिस व इतर यंत्रणा विलंब लावीत असून ते विलंब का लावीत आहेत असा सवाल करीत तपासात विलंब झाल्यास पुरावे नामशेष होतात त्यामुळे या प्रकरणाचा सरकारने लवकरात लवकर तपास करून आरोपींना शिक्षा देवून संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा असेही ते म्हणाले.
यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, माजी आ. रामराव वडकुते, मनोज आखरे, द्वारकादास सारडा, संजय देशमुख माधव कोरडे, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, सरपंच आसिफ पठाण, माणिकराव लोंढे, भिकाजी किर्तनकार, यांच्यासह संस्थानचे पदाधिकारी व अधिकारी आदींची उपस्थिती होती. यावेळी गावकऱ्यांनी विविध मागण्यांचे निवेदने दिली.

# ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक माणिकराव टाकळगव्हाणकर यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**
ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक माणिकराव टाकळगव्हाणक यांच्या शताब्दी वर्ष पूर्तीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शाल श्रीफळ, सन्मानपत्र तसेच सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला तसेच हॉटेल शांतीचे देखील थाटात उद्घाटन जयंत पाटील यांचेहस्ते करण्यात आले.
येथील अकोला बायपासजवळील हॉटेल शांती येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी बोलतांना जयंत पाटील यांनी ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक माणिकराव टाकळगव्हाण यांच्या कार्याबद्दल त्यांचे कौतुक केले. त्यानंतर ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक माणिकराव टाकळगव्हाणकर यांचा कुटुंबासमवेत जाहीर सत्कार केला. यावेळी माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी खा हेमंत पाटील, माजी मंत्री सूर्यकांता पाटील, जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, ॲड सतीश देशमुख, अनिल पतंगे, गोपू पाटील, खंडेराव सरनाईक, बाळु चव्हाण, सौरभ चव्हाण आदींची उपस्थिती होती.

# ४ डी आजाराच्या रूग्णांसाठी जिल्हा रूग्णालयात वॉटर कुलर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**
राष्ट्रीय अभियानांतर्गत व केंद्र शासनाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या वैद्यकीय पथकाकडून ० ते १८ वर्षे वयोगटातील संदर्भीत ४ डी आजाराच्या रूग्णांना संदर्भसेवा देण्याकरिता



जिल्हा रूग्णालय येथे डिईआयसी केंद्र स्थापन करण्यात आले आहे. जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक संस्था स्प्रीडींग बिल्स फाऊंडेशन ठाणे येथील संचालीका ॲड रितीका दुबे यांच्या सहकार्याने ५० लिटर शुध्द पाण्याचे वॉटर कुलर बसविण्यात आले आहे. अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ गोपाल कदम यांचेहस्ते या वॉटर कुलरचे पूजन करून रूग्णांसाठी खुले करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सीमा सिंग या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आशा क्षीरसागर, सुजाता पाहूरकार, लक्ष्मण गाभणे, ज्ञानोबा चव्हाण, राजेंद्र खंदारे, बद्रीनाथ शेळके, रावसाहेब वाघोळे, अकीब यांच्यासह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# घरकुलाच्या दुसऱ्या हप्त्यासाठी १५ हजाराची लाच घेणाऱ्यास अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ फेब्रुवारी**
कळमनुरी पंचायत समितीअंतर्गत घरकुलाचा ७० हजारांचा दुसरा हप्ता देण्यासाठी १५ हजाराची लाच घेणाऱ्या कंत्राटी अभियंत्यासह खाजगी व्यक्तीला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. याप्रकरणी दोघांवर कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
कळमनुरी तालुक्यातील एका लाभार्थ्याला घरकुल मंजुर झाले होते. या घरकुलाची पाहणी करून दुसरा हप्ता बँकेत जमा करण्यासाठी कंत्राटी अभियंता सागर पवार याने १५ हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली होती. या प्रकरणात

... विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर दि २४ फेब्रुवारी रोजी लाचलुचपतचे उपाधिक्षक विकास घटवट, निरीक्षक विनायक जाधव, सपोउपनि शेख युनुस, विजय शुक्ला, जमादार तान्हाजी मुंडे, भगवान मंउलीक, राजाराम फुफाटे, रवींद्र वरणे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, गोविंद शिंदे, पंडीत वाघ, गजानन पवार यांनी दुपारी पंचायत समितीच्या परिसरात सापळा रचला होता. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराने लाचेची १५ हजार रूपयांची रक्कम आणल्याचे सांगितल्यानंतर कंत्राटी अभियंता पवार याने सदर रक्कम खाजगी व्यक्ती संजय मोरे रा कामठा याच्याकडे देण्यास सांगितले. सदर रक्कम स्विकारताच ...

... ताब्यात घेतले. याप्रकरणी कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
याप्रकरणात लाचलुचपतच्या पथकाने दोघांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडून एक मोबाईल, तसेच ११ हजार रूपये जप्त करण्यात आले आहेत. पथकाने कंत्राटी अभियंता सागर पवार याच्या मोबाईलचे कॉल रेकॉर्डीग काढण्याची तयारी चालविली आहे. गोरगरीबांना घरकुल देण्याचे काम शासनाच्यावतीने होत आहे परंतु काही अधिकारी व कर्मचारी गोरगरीबांची आर्थिक पिळवणुक करीत असल्याचे जिल्ह्यात दिसत असून याकडे जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी ...